# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १५ माहे डिंसबर सन १८७८ इसवी. अंक ५०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकाकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०६ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कांमेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबमंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ०६ |

## जाहिरात.

खालीं लिहिलेले कायदे आमचे एथें विक्रीस आहेत.

| | किंमत. |
|---|---|
| सिव्हिल प्रोसिजर कोड. | ३०१२ |
| इंडियन पिनल कोड. | १०१० |
| पुराव्याचा आक्ट. | १ |
| मुदतीचा आक्ट. | ०५ |
| रेजिस्ट्रेशन आक्ट. | ०७ |
| जनरल स्टांप आक्ट. | ०५ |
| कोर्ट फी आक्ट. | ०७ |

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस —

वि. वि. पत्रकर्ते महाराज आपल्या सुंदर पत्रीं खालीं लिहिलेल्या चार ओळी प्रसिद्ध कराल ही आशा धरून विनंती करीत आहे.

विद्वान कोणास ह्मणावें याविषयावर उत्तम निरूपण देऊन सर्वांचा एक समज करून देणें ही दुरापास्त गोष्ट आहे. अलीकडे इंग्रजी राज्याची चांगली मजबूद पैरवी झाल्यापासून लोकांत त्या भाषेत बरें च ज्ञान झालें आहे. इंग्रजी शिकून बी. ए, एम. ए., एल. एल. बी. वगैरे परीक्षा देऊन मोठ्या हुद्याच्या जागा मिळविणें. साहेब लोकांसारखे बूट, स्टाकिंग घालणें, चिरूट ओढणें, तोंडानें चमत्कारिक सूर काढणें, एकंदरींत त्या नमुन्याप्रमाणें वागून दाखविणें आपल्या पूर्वजांस नांवें ठेवणें त्यांणीं केलेल्या अतिउत्तम ग्रंथास दोष देणे, आपल्या हिंदु धर्माचा तिरस्कार करणें, आपल्या रीतीभाती सोडून परक्याच्या स्वीकारणें, आशा गोष्टी ज्यांकडून घडून येत असतील ते आपल्या स्वतांच्या समजुतीनें व हल्लीच्या मानानें आणि पुष्कळ लोकाच्या समजुतीप्रमाणें मोठे विद्वान असे समजले जातात. वेद विद्येंत चांगले प्रवीण झाले, तोंडानें वेदाचीं पारायणें घडघडा ह्मणूं लागले ह्मणजे मोठे विद्वान असे कोणी ह्मणतात. शास्त्रांचा चांगला अभ्यास करून संस्कृत भाषेचें मार्मिक ज्ञान झालें आणि भारत भागवता सारख्या ग्रंथांचें भाषांतर करून सांगितलें ह्मणजे विद्वान झाला असें कोणीं ह्मणतात. वैद्यशास्त्र पहून नाडी परीक्षा करून पेंडु, क्षय वगैरे सारख्या मोठ्या रोगांवर औषधें देऊन रोगग्रस्तास रोगापासून सोडविणारे जे आहेत त्यांस कोणी विद्वान ह्मणतात. इंग्रजी कायद्याचा आपल्या देशांत व इंग्लंडांत जाऊन अभ्यास करून वकीली करणें, ब्यारिस्टरचें काम करणें आणि जड जाच्या पदव्या व न्यायाधिशाच्या जागा मिळवून नय्यायिक होणें यांस कोणी विद्वान ह्मणतात.

याचप्रमाणें नाना प्रकारच्या कसबांत किंवा गुणांत प्रवीण होऊन संपत्ति, लौकिक, अब्रू मिळवुन लोकांत नाव गाजविणें हें ज्या कडून झालें अगर होत आहे. त्या त्या मानानें लोक त्यास विद्वान ह्मणतात. तर खरी विद्या कोणती व ती ज्याच्या अंगीं असल त्याचीं लक्षणें कशीं ओळखावीं याचीं आपल्या पत्रांतून कोणी व्याख्या देतील तर तिची हकीकत माहीत होईल.

परंतु तें होंईपर्यंत माझ्या अल्प मतीनें जे विचार मला आठवले आहेत ते मी कशद्रय जोडून विनयपूर्वक आपल्यास कळवीत आहे. यांत कांहीं न्यूनाधिक्य असल्यास थोरानीं क्षमा करून न्यूनता पूर्ण करावी.

धंद्याचे मुख्य तीन प्रकार— कृषिकर्म करणें, उदीम व्यापार करणें, आणि चाकरी करणें, यांचे एकंदर प्रकार असंख्य आहेत. कोणत्याही कसबांत किंवा धंद्यांत लिहिण्या वाचण्याचा गुण असणें हा विशेष बुध्दी वाढविणारा असा समजला पाहिजे. गणा व्यतिरिक्त जीं मनुष्यें असतील तीं केवळ नावांचीच मनुष्यें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. जसा बुद्धीचा उपयोग करावा व जशी ती वळवावी तशी वळते. हें ईश्वर प्रेरितबीज मानव जातीमध्येच आहे. त्याचा उपयोग मनुष्यानीं योग्य रीतीनें करावा ह्मणजे कोणत्या धंद्यांत किंवा कामांत सत्यासत्याचा निवाडा करून विचार करून वागत जाणें हीच खरी विद्या आणि ज्याच्या अंगीं ती असेल त्यासच विद्वान ह्मणावें याचीं लक्षणे आणि प्रकार जरी बहुत आहेत तरी मूळ एकच आहे.

सर्व प्रकारच्या कामांत न्यायाधिशाचें काम फारच विचाराचें आहे. कारण न्याय न्यायाचा निवाडा करणें ह्मणजे जसा राजहंस पयोन्वित जलापासून पय एकीकडे करितो. त्या राज हंसाप्रमाणें न्यायाधिशांत गुण असले पाहिजेत. तरच प्रजेस खरा न्याय मिळत जाईल. नाहीं तर विनाकारण एखाद्या निरपराध्यास, अविचारानें, लोभानें, भिडेनें, न्याय करण्याचें ज्ञान जसें असावें तसे नसल्यानें व इतर अनेक कारणानीं, शासन होणें, आणि अपराधी सुटणें, हें कोणासही आवडणार नाहीं; कदाचित मनुष्यास आवडेल पण ईश्वरास आवडेल असें नाहीं. त्यास जी गोष्ट आवडेल ती करणें हीच विद्या आणि ती करणारा जो मनुष्य असेल तोच विद्वान यांत संशय नाहीं.

न्यायाधिशानें मनांत असा विचार करावा कीं, आज मला हा अधिकार मिळाला तो कोणाच्या कृपेनें मिळाला. मी हें जें काम करीत आहे ही कोणाची सत्ता आहे? आज मी जर कांहीं बरें वाईट केलें तर तें मनुष्यास जरी कळणार नाहीं तरी ईश्वरास कळेल आणि याबद्दल त्या सर्वसाक्षी परमेश्वरापुढें झाडा द्यावा लागेल हें पूर्ण लक्षांत वागवावें ही गोष्ट हरएक कामांत सर्वांस सारखी लागू आहे. याचप्रमाणें सर्वांनीं आपापल्या कामांत विचार करावा हें उचित आहे.

मी, गरीब अनाथ निरपराधी यांस शिक्षा करितों तर मला कोणी शिक्षा करणारा नाहीं काय? हें मनांत आणित जावें. सृष्टिकर्त्यांच्या करामतीचें वर्णन यथायोग्य कोणाच्यानेंही करवणार नाहीं. त्याची अगाध करणी तोच जाणे. त्यानें असा कांहीं चमत्कार करून ठेविला आहे कीं, त्रिविध ताप प्राणिमात्रांच्या मागें लावून दिले आहेत. त्यांत मनुष्यावर याचा फार जबरदस्त अमल आहे. दुसऱ्यास पीडा करणें हें सत्तेमुळें, बळामुळें किंवा द्रव्यामुळें मोठ्याच्या हातीं आहे. परंतु जगन्नियंत्यानें काय युक्ति केली आहे! ज्याच्या त्याच्या शरीरांतूनच दुःखें आपोआप उत्पन्न होऊन तीं यांस अत्यंत वेदना करितात. हें सर्वांस माहित आहेच. जर मी दुसऱ्यास विनाकारण पीडा करीन तर मलाही कोणी पीडा करणारा आहे. यास किती एक उदाहरणें आपल्या डोळ्यापुढें ढळढळीत दिसत असून व त्यांतून आपण कित्येक अनुभवित असून आपल्या डोळ्यावरची झापड निघत नाहीं. काय चमत्कार हा? तीं उदाहरणे अशीं.

कित्येक न्यायाधीश व लहान मोठे सताधीश अन्यायानें वागून सरकारी काराग्रहांत दुसऱ्यास जें ते विनाकारण दुःख भोगावयास लावितात. तेंच दुःसह दुःख त्यांच्याच वाट्याला ईश्वरसत्तेनें प्राप्त झालें असे पुष्कळ पहाण्यांत आलेले आहेत. जर कदाचित दैव योगानें सरकारच्या नजरे खालून पार पडले असतील तरी परमेश्वराच्या सर्वज्ञ दृष्टींतून कधीही पार पडावयाचे नाहींत. ह्मणजे नाना प्रकारचे भयंकर शरीराला रोग त्यांस भोगणे भाग पडत असतें हें सिद्धच आहे. ईश्वरसत्ता केतीक जीं जीं दुःखे तो योजितो तीं योग्यायोग्य पाहूनच योजित असतो. त्यांच्या योजनेंतून कोणीही सुटणार नाहीं. हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें. एका पुरुषाचे ह्मणणें आहे व तें किती सयुक्तीक आहे हें त्याच्याच अर्थावर दृष्टी दिली असतां सहज ध्यानांत येण्या जोगे आहे. तें असें—

न्याय ह्मणिजे तो शाश्वत ॥<br>
अन्याय ह्मणिजे तो अशाश्वत ॥<br>
वाष्कळ आणि नेमस्त ॥<br>
एक कैसे ॥१॥

पत्र कर्ते महाराज पत्रविस्ताराची माफी असावी हे विंनती तारीख ३ दिसेंबर सन १८७८ इसवी.

आपला सेवक<br>
(क्ष)

वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष वद्य ६ शके १८००

## ईस्ट इंडिया रेलवे सरकार घेणार.

हिंदुस्थानांतील पूर्वींच्या मोठमोठाल्या रेलवे व्यापारी मंडळींच्या आहेत व त्यांचे भांडवलास शिरस्त्याप्रमाणें व्याज आलें नाहीं तर सरकार व्याजाची पुरी रकम भरून देतें हें आमचे वाचकांस ठाऊक असेल. त्या रेलवेस खर्च मनस्वी लागला आहे व चालू खर्चही त्यांचा फार असतो ह्मणून अलीकडे कित्येक वर्षे सरकार आपले मालकीचेच लोखंडी रस्ते करूं लागले आहे. त्यांनां स्टेट रेलवे असें ह्मणतात. पंजाब स्टेट रेलवे, रजपुताना स्टेट रेलवे, धोंड मनमाड स्टेट रेलवे, उमरावती स्टेट रेलवे, खामगाव स्टेट रेलवे इत्यादि रेलवे सरकारी आहेत. या शिवाय कांहीं रेलवे

लागलें. तेव्हां अशा प्रसंगांतच आपलें मंडळ एथें येतें व कांहीं अधिक उणें होतें तर सख्यत्वांत व मित्रत्वांत मी कृत्रिम केलें असें मानण्यास आणास कारण झालें असतें. कां तर तशा कृत्यास मला आपण गन्नेदार धर्के असें लिहून चुकल्याच आहां. आतां हें कार्यकारण कांहीं लागू होत नसेल व येणारें वकील मंडळ केवळ सख्यसंकेत वाढविण्याकरितांच आलेलें भयप्रद जुलूम जबरदस्ती अगर कांहीं आगळीक करणारें नसेल तर तें येऊं देण्यास मजकडून मोकळीक आहे. स्नेहसंकेती उभय राजाकडून अशा मंडळ्या वारंवार परस्पराकडे जातात व येतात. जर आपण ह्मणतां कीं पिढीजाद असलेली दोस्ती पुढें चालविण्याचा आमचा निश्चय आहे तर मीही खात्रीनें सांगतों कीं ब्रिटिश सरकारासी मी कांहीं दुष्मानी चालवूं इच्छित नाहीं. आपले ताब्यांतील अधिकाऱ्यांनीं अपमानकारक लेख माझे अधिकाऱ्यांस न लिहावे या विषयीं आपण बंदोबस्त करावा. आणि आपली इच्छा आहे तर आपलें सख्यसंकेती वकील मंडळ रशियन वकीलाप्रमाणें २९ किंवा ३० लोकांनिसी इकडे पाठवावें थोडे दिवस राहून तें परत जाईलच. व हा ईश्वराचा दास त्याला कांहीं हरकत करणार नाहीं.

## वऱ्हाड.

वाशिमच्या कचेरीची जागा वाढविण्याकरितां नबीखांनी ५ शेतें मिळून ९९ रु. सान्याची ११० एकर जमीन ९६३ रु० मोबदल्याकरितां देऊन घेण्याचा ठराव झाला आहे.

गल्ल्याची धारण १६ शेरांहून कमी असल्यामुळें यंदा तिमाहींत महागाईभत्ता देण्याचा ठराव झाला आहे.

बिलायतेस रजेवर असलेले मेजर हडलस्टन साहेब, क्या० फिटझरल्ड साहेब, व मि० नौरिस साहेब पुढील महिन्याचे तिसरे आठवड्यांत इकडे येणार असें समजण्यांत आलें आहे.

रा. रा. श्रीराम भिकाजी इजुकेशनल इन्स्पेक्टर अकोट तालुक्यांत जाण्याकरितां काल रोजीं एथें आहेत.

मुंबई इलाख्यांत शेतकी संबंधी विद्याभ्यास शाळांतून करविण्याची तजवीज झाली आहे. त्याप्रमाणें होणें आमचे वऱ्हाड प्रांतांतही फार अवश्यक आहे, सबब राव बहादूर नारायण भाई डायरेक्टर याविषयीं विचार करून सरकारास आणवितील तर चांगलें होईल.

कापसाचे बाजारा करितां म्युनिसिपालिटीकडून नियम ठरून ते संगशना करितां रासिडेंट साहेबा कडेगेले आहेत. तरी हंगाम जाऊं नये ह्मणून डिपुटी कमिशनर साहेबांनीं तूर्त तगपक्का, बाजारचा जागा, तराजू, बासल्या वगैरे व्यापारी लोकांस देण्याची तजवीज चालविली आहे. व एक दरोगा २५ रुपयाचा मुकरर केला आहे. ती जागा म्युनिसिपालिटी कडील कारकून रा. रा. दामोदर विठ्ठल यांस देण्यांत आली आहे.

विषप्रयोगाचे मुकदम्यांत विषाची बरोबर चिकित्सा होण्याकरितां तें मुंबईस केमिकल अनालाइझर ह्मणून आहेत त्यांजकडे पाठविण्याची वहिवाट आहे त्याप्रमाणें तें जात असतें परंतु त्या संबंत रेसिडेंट साहेबांचे सर्क्युलराप्रमाणे माजिस्ट्रेट व पोलिस सुपरिंटेंडेंट हे मुकदम्यांतील कच्ची हकीकतींचा रिपोर्ट पाठवित नाहींत त्यामुळें चांगला खुलासा न होऊन कित्येक गोष्टींत सदर्हू डाक्टर यांस निरर्थक त्रास होतो सबब जुडिशियल खात्याकडून त्याविषयीं तजवीज रहावी. असा बद्दल केमिकल अनालाइझर यांणीं आपले गुदस्त सालचे वार्षिक रिपोर्टाचे १०वे कलमांत तपशीलवार अभिप्राय लिहिला आहे.

केरोसाईन आयल या नावाचें दगडापासून निघणारें तेल अलीकडे मुंबईस व बाहेर प्रांतीं पुष्कळ वहिवाटींत आलें आहे. शहरांतून तर पुष्कळच, पण खेडे गावांतूनही त्या तेलाचे दिवे लोक वापरूं लागले आहेत. त्या विषयीं केमिकल अनालाईझर यांनीं आपले रिपोर्टांत असें लिहिलें आहे कीं, हें तेल हल्लीं मुंबईत व इतर बंदरीं फार वाईट प्रकारचें विक्रीस आलेलें आहे. व त्यापासून परिणाम फार भयंकर होण्याजोगे आहेत. सबब हिंदुस्थान सरकारानें या गोष्टीकडे लक्ष्य पुरवून एक कायदा करावा ह्मणजे या गोष्टीचा बंदोबस्त होईल. व चांगलें तेल विकावयास येईल.

मेहकर ( मित्राकडून ) ता. १३।१२

यस्य चित्तं दयाभूतं करया सर्व जंतुषु ॥
तस्यज्ञानेन मोक्षेण किं जटा भस्म लेपनं ॥ १ ॥

या श्लोकांतील श्लेषार्थाप्रमाणे ज्याचें चित्त कृपेंकरून सर्व प्राणिमात्रांचे ठायीं द्रवयुक्त आहे त्याला जटाधारण किंवा भस्मलेपन इत्यादि बाह्यसाधनें नसलीं तरी तो सत्पुरुष जाणावा असें होतें पण असे पुरुष या जगांत विरळा सांपडतात. तशांत राजसत्ताधीश जे आहेत त्यांत हा अनुपम गुण असणें फारच कठिण. एका कवीनें ह्मटलें आहे कीं,

शैले शैले न माणिक्यं
मौक्तिकं न गजे गजे ॥
साधवो नहि सर्वत्र
चंदनं न वने वने ॥ २ ॥

माणिक रत्न पर्वताचे ठायीं असतें खरें, पण सर्व पर्वतांत तीं मिळत नाहींत. हत्तीचे ठायीं मोत्यें असतात पण सर्व गजांचे ठायीं असत नाहींत. इत्यादि आणखी कांहीं प्रकार आहेत तद्वतच वरील गुणवंत पुरुषाचा प्रकार होय. आतां सुदैवेंकरून अशा अमोलिक रत्नाचा लाभ या वुलढाणे जिल्ह्यांतील लोकांस सांप्रत त्या जिल्ह्याचे अधिकाऱ्यापासून होत आहे असे बहुत सुज्ञ ह्मणजे मे० बुधवी साहेब बहादुर होत जे आंचे स्वभावावरून व थोरवीनें जाणतात. ते निर्विवाद कबूल करतील. ईश्वर कृपेंकरून त्यांचा संबंध या जिल्ह्यांतील सर्व खात्यांतील लोकांशी असल्यानें जेव्हां जेव्हां कामाच्या संबंधानें जिल्ह्यांत फिरावयास निघतात तेव्हां आपल्या खात्यांतील कामा खेरीज इतर सरकारी कामें कशीं चाललीं आहेत, याकडे उत्तम लक्ष पुरवून त्यांस उत्तेजन देण्याकडे फार दयाळु अंतःकरणानें अतिशय झटतात यामुळें सर्वांस उमेद येऊन जिल्ह्याची दिवसें दिवस सुधारणा झाल्यावाचून रहाणार नाहीं हें उघड आहे. उदाहरणार्थ पहा कीं, रतय लोकांचे, आरोग्याकडेस व विद्यावृद्धीकडेस साहेब बहादूर यांचें लक्ष किती आहे तें. या खेपेस तालुक्याचे जमाबंदी करितां साहेब स्वारी एथें चार दिवस राहून आजच जानेफळाकडे चालती झाली.

या संधींतच दोन दिवस फुरसत करून एथील इं. म. व हिं. शाळा पहाण्यास गेले होते. मुलांचा इंग्रजी, मराठी व भूगोल वगैरे विषयांत चांगला अभ्यास झाला आहे हें पाहून साहेब खुष झाले असें त्यांनीं प्रसिद्ध ठिकाणीं बोलूनही दाखविलें त्यावरून समजतें. खेरीज मुलांची शरीरसंपत्ती सुधारावी या हेतूनें एथें शाळेला लागूनच साधारण व्यायामस्थळ नुकतेंच तयार करवून विद्यार्थ्यांस कांहीं कसरत शिकविण्याचा प्रकार सुरू आहे तोही त्यांचे अवलोकनांत आला. पण शाळा व कसरतीचा प्रकार यांस गावांतील चार सभ्य लोकांची मदत आज पावेतों न झाल्यामुळें निराश्रिता प्रमाणें तीं सांप्रत दीनावस्थेंत आहेत हें त्यांचे स्पष्ट लक्षांत आलें. पुढें स्वारी एथील धर्मार्थ दवाखान्यांत गेली तों तेथील स्थिति याप्रमाणेंच शोचनीय निदर्शनास आली त्यावरून या सर्वांस होईल तितका आश्रय देऊन सतेजता आणावी. असें परम दयाभूत साहेबानीं मनांत आणून एथील तहशिलदार कचेरींत ग्रामस्थ साहू, जमीदार व इतर मंडळींची सभा भरविली. तिची हकीकत येणप्रमाणें. सदर्हू सभा तारीख १० मि. रोजीं चार वाजतां भरली. सुमारें १५० मंडळीचा समाज जमला होता. जागेचा वगैरे बेत बराच ठेवला होता. सरकारी कामगार मंडळीही बहुतक सभेस आली होती. सर्वांच मागून साहेब स्वारी सभेंत येऊन दाखल होतांच खुद्द त्यांनीं उर्दू भाषेंत उत्तम प्रकारें उंच स्वरानें सुमारें एक तासाहून अधिक काल पावेतों एकसारखें अस्खलित, आणि चित्तवेधक भाषण केलें आणि मुलांकडून विद्याभ्यास करविणें व त्यांची शरीर प्रकृति चांगली रहावी ह्मणून व्यायाम करविणें तसेंच सरकारी शाळा व दवाखाना गावीं असल्यानें गावास मोठें भूषण आहे असें समजून ग्रामस्थांनीं शाळेस धड्याचे व गैरे जें सामान अवश्य असावें तें देणें व दवाखान्यांत औषधें असावींत या करितां सरकारांत वर्गणी भरणें ह्मणजे अशा गावीं एखादि लहानशी लायब्ररी असणें या गोष्टी किती महत्वाच्या व गावास श्रेयस्कर आहेत हें अगदीं अनुभवजन्य दृष्टांतानीं इतकें स्पष्ट करून दाखविलें. कीं त्यापासून कठोर अंतःकरणाचेही द्रव न आल्यावाचून राहिला नसेल अशी पुष्कळांची खात्री झाली. आजपावेतों अशा गोष्टी या ठिकाणीं घडून आल्या नाहींत या विषयींही साहेबानीं फार दिलगिरी दर्शविली तेणेंकरून तर ग्रामस्थ मंडळी फार विरली असें मध्यंतरीं जे उद्गार निघत त्यांवरून स्पष्ट होई. या प्रकारें साहेब बहादुराचें भाषण संपल्यावर एथील इं. म. शाळेचे हेडमास्तर यांनीं साहेबानीं उर्दू भाषेमध्यें केलेल्या भाषणाचा सारांश व त्या बद्दल त्यांस झालेले श्रम यांचे थोडक्यांत विवेचन करून या सर्व कामीं सावकार व जमीदार लोकांनीं उदार हस्तानें मदत देणें अगदी अवश्य आहे अशी प्रार्थना केली. त्यावरून हजर आलेल्या गृहस्थांपैकीं अडगावचे राजे हे पूर्वीं जाधव घराण्यांतील असल्याचें समजतें त्यानें समयोचित असें आपल्या उत्तर देण्यांत दर्शविलें कीं

जनिताचोपनीताच यस्तु विद्यांप्रयच्छति
अन्नदाताभयत्राताः पंचैते पितरः स्मृताः

असें महंताचें वाक्य आहे त्याप्रमाणें जी गोष्ट आज्ञा सर्वांकडून होणें राहिली होती ती आज आमचे अन्नदाते जनाब हुशारी साहेब बहादुर यांनीं आह्मास अमृतातुल्य मधुर भाषणानीं समजाविली तेव्हां आतां आह्मी सर्व या कामीं मदत करण्यास अगदीं सिद्ध आहो. पण तेव्हां सायंकाळ होते आला होता व या पुढें उशीर फार होईल असें समजून साहेबांनीं यादी न करितां तहशिलदाराकडेस या कामाची सोंप केली असें समजतें. आतां साहेबानीं अंतःकरण पूर्वक जी या कामीं मेहनत घेतली तिचें साफल्य अल्प स्वल्प प्रकारानें होणार नाहीं असें सर्व ग्रामस्थ लक्षांत ठेवून पुढील प्रसंगीं वर्तन करतील अशी आशा आहे. नाहीं तर:—

आमूल सिक्तः पयसाघृतेन
न निंबवृक्षो मधुरत्व माति॥

या वचनांतील दाखला सांजेल.


## NOTICE.

We the undersigned beg respectfully to inform all, our constituents, customers and the public of out-stations that our business hitherto carried on under the name and style of Messrs Bomanjee Ookerjee & Co. has this day been clossed by mutual consent and al our contracts, estate and assets have from the 13th November 1878 been purchased and taken in his charge by Mr. Pestonjee Rustumjee our creditor.

Mr. Pestonjee Rustamjee will from this day carry on his bussiness under the name and style of Messrs Pestonjee Rustumjee & Co.

All persons indebted to our said firm of Messrs Bomanjee Ookerjee &Co. are requested to pay the same to the said firm of Messrs, Pestonjee Rustumjee & Co.

BOMANJEE OOKERJEE
& Co.


## वर्तमानसार

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीनें कापावर आफिसाकरितां सुंदर इमारत बांधण्याचा विचार केला आहे.

गुदस्त सालीं बेळगाव धारवाडाकडे गुरांनां विषप्रयोग केल्याचे बरेच गुन्हे झाले.

व्हाइसराय साहेब लाहोराहून कांहीं जरूरीच्या कामाकरितां कलकत्त्यास जाऊन नाताळची सुटी संपतांच परत लाहोरास जातील.

मि० पेडर मुंबईचे कष्टम कमिशनर यांस सातान्यास कलेक्टर नेमिले.

मुंबई इलाख्याचे सन १८७७।७८ सालचें उत्पन्न ६३१२८६८ रुपये झालें. हें गुदस्ता पेक्षां पुष्कळ अधिक आहे. तथापि या वर्षीं कापूस व लोकर परदेशीं कमी गेली त्यामुळें व्यापार कमी झाला. व्यापाराची एकंदर ५९,६६,१८,२७१ रुपयांची घडामोड झाली.

मुंबई इलाख्यांतून लढाईवर जाणारें सैन्य जलमार्गानें कराचीकडे रवाना झालें.

अशी वर्तमान आहे कीं, दोन रशियन सरदार, एक डाक्टर व ३० लोक अजून काबूल शहरांत आहेत.

ग्वालेरचे श्रीमंत जयाजीराव शिंदे अलिजा बहादर लाहोरास जाणार.

मुंबईस सात आठ कापसाच्या कंपन्यांचे दिवाळें निघाल्याची बातमी आली आहे.

रेलवे कानफरन्स भरावयाचें होतें ते आतां काबुलचे लढाईमुळें या वर्षीं भरत नाहीं. कारण सरकारी सर्व अधिकाऱ्यांचें लक्ष्य तिकडे लागलेलें आहे. कानफरन्सचे कामासाठीं दोन सरकारी इंजिनियर तयार ठेवलेले लढाईवर गेले आहेत. रेलवेला कामे वाढलीं आहेत. व कित्येक रेलवे आफिसरास लढाईचे सामान सुमान रवाना करण्याच्या व्यवस्थेमुळे तिकडे जाण्यास बनणार नाहीं.

असें ह्मणतात कीं, म्हैसूरच्या छोटे महाराजांच्या लग्नास २२२०० लक्ष रुपये खर्च झाला. ज्ञा. द.

गेल्या आठवड्यांत गवरनर साहेब पुष्कळ गिरण्या पहाण्यासाठीं गेले होते व प्रत्येक गिरणींत लोकांस किती काम करावें लागतें, गिरणींत हवा येण्याची कशी काय सोय आहे व कामगारांचे आरोग्य रक्षणाचे संबंधानें काय कमजास्ती सोय किंवा गैरसोय आहे याची चौकशी केली.

तुर्कस्थान प्रकरणाचा अद्यापि पूर्ण निकाल झाला नाहीं व प्रसंग आला असतां रुमेलिया व बलगेरियो मिळून तुर्कस्थानांत रशियाची अद्यापि सवालक्ष फौज तयार आहे.

रशियापासून भीति नसावी ह्मणून तुर्कस्थान सरकार मिटॉलिटझा एथें एक लाख फौज व ६ हजार घोडे रहाण्यासारखी छावणी व किल्ला बांधित आहे असें समजतें.

बंगाल्यांत जिल्हा जज्जाच्या जागेवर नेटिवास नेमण्याविषयीं जो नुकताच ठराव झाला आहे त्या प्रमाणें कलकत्ता स्मालकाज कोर्टांतील जज्ज बाबू गिरीसचंदर घोस यास गया जिल्ह्याचे डि. जें. नेमणार असें समजतें.

मद्रास एथील एका श्रीमंत मुसलमानानें गेल्या दुष्काळाच्या वेळीं दोन दोन कचित तीन रुपयांस अशा सुमारें २५ मुली विकत घेतल्या आहेत. हें प्रकरण आतां उघडकीस आल्यामुळें सदर्हू मुसलमानावर फौजदारी खटला होणार आहे.

ज्यांची इच्छा असेल त्यांणीं दोन वर्षें पर्यंत अमीराचे नोकरीस रहावें अशी रशियॉ सरकारानें आपले पलटणींतील लोकांस परवानगी दिली आहे असें ह्मणतात. ने. ओ.

सरकारच्या बागात तयार झालेलें ३५००० पौंड सिंकोना बार औषध नुकतेंच मद्रासेस रवाना झालें.

मुंबईचे कित्येक पार्शी अफगाणकामगिरीकरितां सरकारानें नेले.

होळकर महाराजांच्या वडील मुलास मुलगा झाल्याचा समारंभ झाला.

मुंबईला यंदा एल. एल बीच्या परीक्षेस २० उमेदवार होते. त्यांपैकीं सहा पास झाले. त्यांचीं नांवें:—लुइस डिसा, बळवंत नारायण जोशी, भास्कर श्रीधर जोशी, जहांगीर एदलजी मोदी, विनायकगो व रामचंद्र पठवर्धन, द्वारकानाथ सखाराम पीडवळ. सु. प्र.

राकाईल— काकेस पर्वताजवळील बाकू प्रांतांत पेट्रोलियम, केरोसीन, नाफता वगैरे मातीच्या तेलाच्या अतोनात खाणी रशियन लोकांस लागल्या आहेत व ह्या मालाचा व्यापार १८६४ सालांत ६,२०० टनाचा होता तो हल्लीं सालीं एक लक्ष टन पर्यंत वाढला आहे. हा व्यापार रशियनांस चांगला हात देईल असें ह्मणतात.

विलायतेंत चेंडूफळीचा खेळ मैदानांत रात्रीं कृतीच्या विद्युत्प्रकाशानें होऊं लागला. इ. प्र.

---

## विद्याखात्यांत कृषिकर्म शास्त्राची नवीन शाखा.

विद्याखात्यांत सरकार कांहीं नवीन फेरफार करणार अशा विषयीं कित्येक दिवसांपासून वदंता आहे. पुणें एथील डेक्कन कालेजांत बी. ए. चे परिक्षेपर्यंत न शिकवितां कालेजात शिकवीत असलेल्या विद्यार्थ्या संबंधानें बराच खर्च कमी करण्याचा सरकार विचार करीत आहे अशी थोड्या दिवसांपूर्वी बातमी निघाली होती, परंतु त्याविषयीं पुढें कांहीं ऐकण्यांत आलें नाहीं. शेतकी संबंधानें शाळा स्थापन करण्याचा सरकारचा इरादा आहे असेंही थोड्या दिवसांपासून ऐकण्यांत आहे व त्या विषयीं गवरनर साहेबानीं तारीख २९ अक्टोबर रोजीं लिहिलेलें मिनिट गेल्या गुरवारच्या सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे. शेतकी संबंधांच विद्येची व माहितीची आमचे लोकांस वास्तवीक फार जरूर असल्याविषयीं आह्मी कित्येक वेळा लिहिलें आहे. व दुसरे विषय एकीकडे ठेवून आह्मी कित्येक वेळीं या विषयीं माहितीही दिली आहे. मद्रास सरकारानें सिदापेठ एथें शेतकी संबंधानें स्थापन केलेल्या शाळेप्रमाणें मुंबई इलाख्यांत आमच्या सरकारानेंही शाळा वगैरे स्थापन करून या महत्वाच्या विषयाकडे लक्ष द्यावें अशा आह्मी कियेक वेळां सरकारांस सूचनाही केल्या आहेत.

आतां सरकारचें या विषयाकडे लक्ष्य लागलें हें पाहून आह्मास आनंद होतो. आपले देशांतील जमीन फार सुपीक असून उत्तम रीतीनें जमीन राखून लागवड करण्याची गैर माहिती, जमीनीपासून सतत पीक घेतल्यामुळें जमीनीची होणारी खराबी व खराब झालेली जमीन पुन्हा पूर्वस्थितीवर आणण्याची साधनें वगैरे शिकल्यापासून जमीनीचें उत्पन्न वाढेल हें सांगण्याची गरज नाहीं. याकरितां सरकारानें या नवीन काढलेल्या खात्यांत शेतकीचीं सुधारणा होऊं इच्छिणार लोक आपलीं मुलें पाठवून सरकारचे इष्ट हेतु तडीस नेण्यास मदत करतील अशी आमची आशा आहे. लोकांस या विषयाची गोडी आहे असें समजेपर्यंत व पैशाचे संबंधानें सवड होईपर्यंत सरकार हें खातें फार न वाढवितां व निराळें कालेज व स्वतंत्र शाळा स्थापन न करितां कालेजाचे ऐवजीं पुणें इंजिनियरिंग कालेजांत एक वर्ग काढणार व लहान शाळांचे ऐवजीं हायस्कुलांतून एक एक वर्ग काढणार. पुढें हें खातें वाढतें व याची सुधारणा होते असें सरकारास दिसल्यास अमदाबाद एथें स्वतंत्र कालेज स्थापन करण्याचा सरकारचा इरादा आहे. तूर्त ६ हायस्कुलांत ६ वर्ग शिकविणार, पैकीं गुजराथेंत ३, खानदेशांत एक व दुसरे ठिकाणीं २. हायस्कुलांतील या वर्गांत शिकण्याची ज्या विद्यार्थ्यांची इच्छा असेल त्यांनीं हायस्कुलांत जे विषय शिकवितात ते सर्वच शिकले पाहिजेत असें नाहीं, परंतु इंग्रजी व दुसरी एत्तद्देशीय जी भाषा हायस्कुलांत चालत असेल ती त्यांस शिकली पाहिजे. ह्या हायस्कुलांतील वर्गांत हायस्कुलांत न जाणारे बाहेरचे विद्यार्थी आले असतां त्यांस घेतले जातील मात्र त्यांस त्यांची एत्तद्देशीय भाषा व इंग्रजी भाषा आली पाहिजे. हायस्कुलांत रोज एक तास प्रमाणें २ वर्षेंपर्यंत शिकलें पाहिजे नंतर पुढें एथील कालेजांत त्यांची परीक्षा घेतली जाईल. ज्यांची परिक्षा उतरेल त्यांस सर्टिफिकेट दिलें जाईल. व या विद्यार्थ्यां पैकीं ज्यांची पुणें एथील कालेजाचे वर्गांत जाण्याची इच्छा असेल त्यांस कालेजांत घेण्यांत येईल व कालेजांत आणखी २ वर्षें शिकल्यावर त्यास कालेजांत आणखी एक परिक्षा होऊन कालेजात शिकल्याबद्दल परीक्षा घेऊन सर्टिफिकेट दिलें जाईल.

पुणें एथें सिव्हिल इंजिनियरिंग कालेजांत जो वर्ग काढणार त्यांत जरी हायस्कुलांतील वर्गांत शिकलेले विद्यार्थी घेतले जाणार आहेत तरी तो मुख्यत्वेंकरून म्याट्रिक्युलेशन परीक्षा दिलेले उमेदवारांसच कृषिकर्मशास्त्र शिकविण्याकरितां काढला जाणार आहे. म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेले विद्यार्थ्यांस या वर्गांत ३ वर्षें शिकावें लागेल व नंतर त्यांची एथील युनिव्हरसिटींत परीक्षा होऊन त्यांस पदवी मिळेल. हायस्कुलांतील वर्गांतून म्याट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्याशिवाय जे विद्यार्थी कालेजांतील वर्गांत घेतले जाणार आहेत त्यांस म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झाल्याखेरीज युनिव्हरसिटीचे परिक्षेस जातां येणार नाहीं. इतकेंच कीं म्याट्रिक्युलेशनची परीक्षा झाल्याशिवाय त्यांस कालेजांत घेतलें जाईल व त्यांस कालेजांत शिकल्याबद्दल मिळालेलें सर्टिफिकेट हायस्कुलांतील सर्टिफिकेटापेक्षां जास्ती महत्वाचें मानलें जाईल.

पुणें एथील कालेजांतील विद्यार्थी शिकून तयार होत पर्यंत हायस्कुलांतील सहा वर्गांवर शिक्षक पाठविण्याची अडचण पडणार आहे करितां मद्रास एथील शिदापेठचे शाळेंतील मुलांची येते जून महिन्यांत ३ वर्षें पुरी होत आहेत तीं पुरीं झालीं ह्मणजे तेथें पास झालेले ६ उमेदवार हायस्कुलांवर पाठविणार व त्यांस ६० रुपये दरमहा देणार व या नंतर जे शिक्षक लागतील ते पुणें कालेजांतुन पाठविणार शिकण्यासाठीं प्रत्येक हायस्कूलाकडे ६ एकर जमीन, एक नांगर व एक हमाल देण्याची तजवीज होणार आहे. येते एप्रिल महिन्यापासून या खात्याची सुरवात होणार आहे.

वर लिहिलेली हकीकत कालेजांत व हायस्कुलांतु जो शास्त्रीय कृषिकर्म विद्या शिकविण्याची त्या विषयीं झाली. परंतु हळू हळू मराठी शाळांतून शेतकी संबंधी साधारण माहिती शिकविण्याचा सरकारचा विचार आहे. साधारणतः तीन तीन शाळांवर एक एक साठ रुपये दरमहाचा मास्तर नेमला असतां फार खर्च येणार नाहीं व जमीनदार लोकांस या विद्येपासून होणारा फायदा दिसल्यावर ते शाचे संबंधानें मदत करतील असें गवरनर साहेबानीं मिनिटात लिहिलें आहे. एतद्देशीय शाळांतून शिकविण्यासाठीं लहान मुलांस समजण्यासारखीं शेतकीच विषयाचीं कांहीं लहान पुस्तकें सरकार काढणार आहे.

म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास झालेले कालेजांत जाणारे विद्यार्थ्यांकरितां १२ रुपये दरमहापासून पांच रुपये दरमहापर्यंत १९ स्कालरशिपा काढल्या आहेत.

या मिनिटीचे अखेरीस गवरनर साहेबानीं असें लिहिलें आहे कीं शेतकीचा धंदा करणारे लोकांत शेतकीच विद्येचा प्रसार होण्यास रिविन्यू खात्यांतील कामगारांस कृषिकर्मशास्त्र आलें पाहिजे. व या खात्याच संबंधानें पदवी देण्याचा एथील युनिव्हर्सिटीनें ठराव केल्यावर रिविन्यू खात्यांत नोकरी देणें ती कृषिकर्मशास्त्र शिकून पदवी मिळालेले लोकांस आधीं दिली जाईल. पुढें जशी जशी या खात्याची लोकांस गोडी लागेल व हें वाढत जाईल तसतसे पाटील कुळकर्णी वगैरे ज्या लोकांच्या नेमणुकी सरकारच्या हातांत आहेत त्यांसही थोडें फार शिकून परीक्षा द्यावी लागेल असें गवरनर साहेबानीं लिहिलें आहे. ने. ओ.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापुन प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २२ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी. अंक


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रेजी लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०६ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गणकरणाच्या हक्या | ०६ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| सावकारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबमंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ०६ |

## NOTICE

We the undersigned beg respectfully to inform all our constituents, customers and the public of out-stations that our business hitherto carried on under the name and style of 'Messrs Bomanjee Ookerjee &Co.' has from the 13th November 1878 been closed by mutual consent and all our contracts, estates and assets have been purchased and taken in his charge by Mr. Pestonjee Rustomjee our creditor.

Mr. Pestonjee Rustomjee will henceforward and from the date above specified conduct our business under the name and style of Messrs, Pestonjee Rutosmjee & Co.

All persons, departments and concerns indebted to our firm of Messrs Bomanjee Ookerjee & Co. are hereby requested to pay the sums in which they are so indebted, to the said firm of Messrs Pestonjee Rustomjee & Co.

BOMANJEE OOKERJEE & Co.

Akola, 15th December 1878.

## नोटिस

नगन वल्लद किसन माहाली सोनार मुक्काम बाळापुर यांस गणु वल्लद निवाजी ढोले सोनार रहाणार बाळापुर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं १६ महिन्यापूर्वी श्रावणमासीं तुमच्या मुलीशीं आह्मी लग्न करावें असा संकेत झाला व तो तुह्मी कबूल केल्यावरून आह्मी पोळ्याचे अधले दिवशीं तुमचे एथें येऊन सोयरीकचा समारंभ केला त्याप्रमाणें माघ फाल्गुन मासीं लग्न करावें असें तुह्मास विचारतां तुह्मी ह्मणाला महागाईमुळें अडचण आहे पुढले वर्षीं करू. त्याप्रमाणें या वर्षीं तुमचा बेत कसा काय आहे ह्मणून १५ दिवसापूर्वी विचारतां तुह्मी स्पष्ट सांगितलें कीं आह्मी आपली मुलगी तुह्माला देत नाहीं पुढें सोयारेकीकरितां आमचा जो खर्च झाला तो मागितला असतां दंडलीच्या गोष्टी सांगितल्या त्यावरून आमचा निश्चय झाला कीं तुमच्याशी सोयर संबंध करूं नये तथापि एक वेळ शब्द गुंतला ह्मणून तुह्मास कायदेशिररितीनें नोटिस देऊन कळवितो कीं तुमची मर्जी असल्यास येत्या फाल्गुनमासीं तुह्मी लग्न करून देण्यास कबूल असल्याविषयीं लेखी कळवावें आणि तुमची इच्छा नसल्यास नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत तुह्मकडे सोयरीकीचे संबंधानें आमची रकम खर्ची पडली आहे ती रोख रुपये १८२, सोन्याचे दागिने सरी पाटल्या तोंगल वगैरे वजन ६ तोळे एक मासा याची किंमत १०९॥, तसेच चांदीचे दागिने हंडोळण, तोडे, पायजिवा बांगड्या पैंजण वगैरे ९०॥ तोळे शिवाय कापड व बिल्हर सामान रु० २६ एकूण एकंदर ४०८ रुपये तुमचेकडे घेणें ठरत आहे तें आठ दिवसांत रोख अगर दागिने कापड आणि बाकी रोखरकम असे पाठवून द्यावे. मुदतशीर तुह्माकडून कोणतीही तजवीज झाली नाहीं तर तुह्मावर दिवाणी कोर्टांत फिर्याद लाऊन व्याजसुद्धा व या नोटिसीचे खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेतली जाईल. कळावें तारीख १७ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) गणु वल्लद निवाजी सोनार
दस्तुर खुद

### नोटिस.

घनाजी वल्लद पुर्णाजी बेलदार वस्ती मौजे वानखेड पातुर्डे तालुके जळगाव जिल्हे अकोले. यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यात येते कीं दिवाळीच्या सुमारास तुह्मी माझे बायकोस मूळ आले असून मी तुह्मास सांगितलें कीं, ती गरोदर असून हल्लीं दिपवळी ही नवळ आहे करितां हल्लीं पाठवीत नसून बाळांतपण झालें ह्मणजे पाठवीन. असें सांगितलें असून तुह्मी तें न एकतां तुह्मी माझे बायकोस न विचारतां घेऊन गेला. तुह्मी या सासरे करितां मी त्यास तजवीज न करितां मी स्वतः तुमच्या एथें बायकोस नेण्याकरितां आलों तेव्हां तुह्मी माझे बायकोस पाठविलें नसून भाषण ही बरोबर केलें नाहीं. व हल्लीं बाळांतपणाचे दिवस अगदी जवळ आले आहेत करितां मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावतांच आठ दिवसांत माझे बायकोस ह्मणजे तुमची लेक नामे तानकी ईस माझे घरीं बाळांतपण होण्याकरितां जरूर पाठवावी. न पाठविल्यास रीतीप्रमाणें नोटिशीच्या खर्चासुद्धां तजवीज करावी लागेल. तुह्मी माझे सासरे करितां ही तुह्मास नोटिस दिली आहे कारण उगीच वाईटपणा येईल. कळावें तारीख १४ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) बापु वल्लद हरी बेलदार
रहाणार मौजे चतारी तालुके
बाळापुर जि० अकोलें
निशाणी खुद हातची.

### नोटिस.

भिका वल्लद यदु सुतार रहाणार मौजे कुंभखेड परगणे धाड तालुके चिखली जिल्हा बुलढाणा यास— साळु मद भिका सुतार मौजे वडद प्रगणे भोकरदन इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आज सुमारे बारा वर्षांपासून तुह्मी मजला आपले घरीं नेऊन जन रीती प्रमाणें नांदवीत नाहीं व मजला कांहीं अन्न वस्त्रही देत नाहीं सबब तुह्मांस ह्या नोटिसीनें जाहीर करण्यांत येते कीं, तुह्मी माझा बारा वर्षांचा अन्न वस्त्राबद्दलचा खर्च दरमहा १० रुपये प्रमाणें १४४० रुपये माझे वडिलास देऊन मजला आपले घरीं आज तारखेपासून तीन वारांचे आंत घेऊन जावे आणि पुढें माझे अन्न वस्त्राची व संसाराची जन रीतीप्रमाणें सोय करून द्यावी. जर सदरी नेमल्या मुदतीचे आंत तुह्मी मला आपले घरीं नेणार नाहीं तर हीच माझी फारकती समजावी. मी नागापुर पिंपळगांव एथें जाऊन दुसरा नवरा करणार आहे नंतर मग आपला मजवर कोणतेही प्रकारें हक्क संबंध रहाणार नाहीं. सदरी वर लिहिलेल्या प्रमाणें खर्च देऊन मजला आपले घरीं न्यावें. अगर माझी फारकती सदरी लिहिलेल्या मुदतीचे आंत साळु वल्लद भवानी सुतार रहाणार मौजे पिंपळगांव सराई यांजला समक्ष भेटून च्यार पंचांचे समोर करून द्यावी नाहीं तर मी नवरा करून जाईन आणि नंतर मग माझे अन्न वस्त्राबद्दल तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चा सुद्धां पैसा तुमचेपासून भरून घेतला जाईल. कळावें. तारीख १३ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) साळू भिका सुतार
निशाणी हातची
बांगडी.


वऱ्हाडसमाचार

मिति मार्गशीर्ष वद्य १४ शके १८००


## धान्याच्या चोऱ्याच्या बाबदींत विलायत सरकारचा ठराव

लंडनाहून इंडिया आफिसांतून मुंबई सरकारास तारीख १४ नोंवेंबरचें पत्र आलें आहे त्यांतील आशयः—

१ जी. आय. पी. रेलवेचे गाडींतून धान्याच्या चोऱ्या झाल्यांसंबंधी आपले दोन डिस्पाच आले ते पोचले व त्याविषयीं विच्यार झाला.

२ धान्याच्या चोऱ्या पुष्कळ व हमेशा होऊं लागल्या ह्मणून त्यांचा तपास करून रिपोर्ट करण्यासाठीं आपण एक स्पेशियल कामिटी नेमली व मि० क्राफर्ड साहेब सिव्हिल सरव्हिस यांनां तिजवर अध्यक्ष केलें. त्यानीं त्या बाबदींत तीन रिपोर्ट केले त्यांत चोऱ्यांच्या विलक्षण प्रकाराविषयीं पुष्कळ शोध करून चांगला खुलासा केला आहे. व रेलवे कंपनीस लोकांचें धान्य चोरीस गेल्याबद्दल पुष्कळ रकमा भरून द्याव्या लागल्या. या चोऱ्या करणारे १७५० लोक अपराधी ठरून त्यांस शिक्षा झाल्या त्यांत ३०६ रेलवेकडील नोकर आहेत. त्यांचे दोन युरोपियन कामदारही आरोपी झाले होते परंतु पुढें दोषनिर्मुक्त झाले.

३ कामिशनानें पहिले रिपोर्टांत सूचना केली होती कीं, रेलवे पोलिस जें स्वतंत्र आहे तें तसें न ठेवितां जिल्ह्या जिल्ह्याचे पोलिस सुपिरिंटेंडेंटचे ताब्यात द्यावें. ही सूचना आपणास मान्य झाली नाहीं तें बरोबर झालें. व आपण योग्य कोणी मनुष्य मिळेपर्यंत कमिटीपैकी मेंबर मेजर वाइज साहेब यांस रेलवे पोलिसावर अधिकारी नेमिलें तें समजलें.

४ हे साधारण मानानें आपण आपल्या अधिकाराच्या मर्यादेंत जितकें करावयाचें तितकें केलें आहे. आतां रेलवे कंपनीस कमिशनाचा रिपोर्ट पाठविला आहे व त्याचे धोरणानें सर्व लोकांचें आणि आपले स्वतांचे फायद्याकरितां पुढें व्यवस्था उत्तम राहील अशा प्रकारचें आपले खात्यांत हुकूम देणें हें काम कंपनीचें आहे व त्याप्रमाणें त्यांकडून होईल अशी आह्मी उमेद बाळगतों.

५ दुष्काळाचे विरळो मुळें धान्याच्या अवेनात चोऱ्या झाल्या. व आतां त्या अगदी बंद झाल्या आहेत हें पाहून आह्मास समाधान वाटतें.

१ कमिशनाकडे दिलेलें हें काम फार अवघड व मोठ्या जोखमेचें होय. याला फार शांती व गंभीरता पाहिजे. असलें नातून काम करतांना चुकरा होण्याचा संभव आहे व या प्रमाणें या झाल्या तरी मि० फर्ड साहेब आणि मेंनर यांनीं मोठ्या हुशारीनें आणि चौकसपणानें हें काम बजाविलें याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

कानब्रूक

## व्हाईसराय साहेबांचें संभाषण

अफगाणिस्थानावर लढाई सुरू झाली आहे व तिजमध्यें ब्रिटिशसरकारास सहाय करण्याकरितां पंजाबांतील पतियाळा, नभा, झिंद, कपुरथळा, सिमूर, आणि फरीदकोट एथील राजांनीं आपल्या फौजा सरकारच्या स्वाधीन केल्या आहेत. त्या तीन हजार फौज असून तिजबरोबर १० तोफा आहेत. सरकारानें एक युरोपियन जनरल तिजवर मुकर केले आहेत. ती फौज लाहोरास जाऊन दाखल झाली तेव्हां १७ वे तारखेस व्हाईसराय साहेबांनीं तिची कवाईत पाहिली त्या प्रसंगीं सदरील सर्व राजे व भावलपुरचे नबाब, काश्मिरचे महाराजे हेही होते. कवायत पाहून व्हाईसराय साहेब फार खुष झाले. व त्यांनीं सुरस भाषण केलें. त्यांतील तात्पर्य:—

प्रथम व्हाईसराय यांनीं प्रत्येक राजाचें वर्णन करून त्यांच्या राजभक्ति विषयीं संतोष प्रदर्शित केला. या राजांच्या वडिलांनीं मागें बंडाचे वेळीं असाच आपल्या फौजा सरकारचे दिमतीस दिल्या होत्या त्याजबद्दलही वाखाणणी झाली. नभा आणि कपुरथळा एथील सैन्य फार चांगलें आहे असें ह्मणाले. कांहीं राजांनीं थोडें सैन्य पाठविलें याजबद्दल व्हाईसराय साहेब ह्मणाले कीं, संख्येवर कांहीं नाहीं. भक्तिपुरःसर जी थोडीबहुत मदत सर्वांनीं केली तिजबद्दल सर्वांचे आह्मी सारखे आभार मानितों. नंतर राजे लोकांस निमंत्रण करण्याचें कारण सांगितलें कीं, काबूलच्या अमिरानें सरकारचा अपमान केला. ह्मणून त्यावर फौजा पाठविल्या आहेत. त्यानें केल्या कृत्याचें शासन त्याला मिळालें. ज्या आलिमशीदीहून ब्रिटिश वकील मंडळास माघारें लाविलें होतें तें स्थान ब्रिटिश फौजानीं सर केलें. अमिराच्या ९० तोफा हस्तगत केल्या. दोन ठिकाणीं त्याच्या फौजांचा पराभव केला. शत्रूच्याही ठायीं ब्रिटिशसरकाचें मन उदार नाहीं असें नाहीं, परंतु न्याय झाला पाहिजे व आगळिक करणाराचा समाचार घेतला पाहिजे. नाहींतर ब्रिटिश राज्यावर जे लोक निष्ठा ठेवणार त्यांच्या दृष्टीनें हें सरकार अयोग्य ठरेल ह्मणून सरकारास हें कृत्य करावें लागलें. ही लढाई आह्मी केवळ नखुषीनें चालविलेली आहे अमिरास नाउमेद होऊन तो शुद्धीवर येईल तर इनक्यावरही आह्मी लढाई बंद करूं. दुःखानुभवाच्या शाळेंतील अज्ञान आणि गर्व हे दोन आळशी विद्यार्थी आहेत. जी मैत्री कृतघ्न पणानें त्यानें तोडिली तिची योग्यता तो बरोबर समजे पर्यंत त्याला सक्त धडा कदाचित घालून द्यावा लागेल. अथवा शत्रुत्वाला त्यानें उत्तेजित केलें सबब त्याचा प्रभाव त्याचे ध्यानांत चांगला येण्याकरितां त्याला शक्तीचा धडा घालून द्यावा लागेल. आतां लढाईचे संबंधांत ब्रिटिश फौजेस नुकसान येऊ शकेल व तिचे वांटकरी आपणासही व्हावें लागेल तरी फत्ते होईल हें खचीत आहे. नंतर पलटणींतील शिपाई आणि सरदार यांनां व्हाईसराय ह्मणाले कीं फौजेची कीर्ति अपकीर्ति तुह्मांवर अवलंबून आहे. तुमचे वडील चांगले लढले आहेत त्यावरून तुह्मी ही चांगले लढाल असा आह्मांस भरवसा आहे. पण लक्षांत असूं द्या कीं नुसतें धैर्य किंवा हिंमत ही मनुष्यास चांगला शिपाई करीत नाहीं. अधिकाऱ्यांनीं शिपाई लोकांवर व त्यांच्या माणसावर चांगली नजर ठेवली पाहिजे व त्यांचें आरोग्य आणि सुख याकडे लक्ष पोंचविलें पाहिजे. तुह्माला आतां नव्या बंदुका दिल्या आहेत. बातमेत आणि योग्य वर्तन हींच चांगल्या फौजेचीं मुख्य चिन्हें आहेत हें आपण काळजीपूर्वक लक्षांत ठेवाल. नंतर व्हाईसराय साहेब ह्मणाले कीं ही कवायत पाहून आमचे मनावर जो ग्रह झाला त्याविषयीं चक्रवर्तिनी साहेबास आह्मी लिहून कळवूं. आतां शेवटचें हेंच सांगतों कीं तुह्माला या सुरू प्रकरणांत वैभव, सिद्धी, आणि मान असो, व चक्रवर्तिनी साहेबांचें ईश्वर संरक्षण करो.

## चक्रवर्तिनी साहेबांच्या कन्यचा मृत्यू.

आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, आमच्या चक्रवर्तिनी साहेबांची द्वितीय कन्या प्रिन्सेस अलाईस या नावाची होती ती या महिन्याच्या १६ वे तारखेस मरण पावली. चक्रवर्तिनी साहेबास ९ मुलें असून तीं सर्व चांगल्या आरोग्यानें नांदत आहेत. व त्यांतुन कित्येकांस विपुल संतती ही होऊन चक्रवर्तिनी साहेबांचा अपत्यवृक्ष मोठा फैलावला आहे हें पाहून आह्मी व सारीं राष्ट्रें संतोष मानीत होतीं. थोड्या वर्षामागें वडील चिरंजीव युवराज प्रिन्स आफ वेल्स यांस भयंकर आजार झाला होता त्यांतूनही कृपाळू परमेश्वरानें त्यास आरोग्य केलें व लोकांस आणि चक्रवर्तिनी साहेबास संतोषित केलें; पण अलीकडच्या या कन्या घाताच्या वर्तमानावरून सर्वांस फार शोक झाला आहे. या फार ममताळू, हुशार, व लोकप्रिय होत्या. यांचें वय ३५ वर्षांचें होतें. इतक्या अकालीं यांवर मृत्यूचा घाला पडला याजबद्दल वाईट वाटतें. गेल्या महिन्यांत या बाईची एक च्यार वर्षांची कन्या मरण पावली ते दुःख विसरले नाहीं तों चक्रवर्तिनी साहेबास हा आपल्या लाडक्या मुलीच्या मरणदुःखाचा जबर प्रहार बसला. परंतु उपाय काय? ईश्वर ठेवील तसें राहिलें पाहिजे. जामात ही गेले महिन्यांत फार आजारी झाले होते पण त्यांस ईश्वरानें आरोग्य केलें. यांनां लग्न समयी चक्रवर्तिनी साहेबांनी ६००० रुपयांची नेमणूक करून दिली आहे व तीन लक्ष रुपये आंदण दिलेले आहेत. तसाच "हिज रायल हाइनेस" हा किताब देऊन त्यांस "नाईट आफ दिगार्टर" केलेले आहे. यांनां एक मुलगा विक्टोरिया अलबर्ट नावाचा १९ वर्षांचा, इलिजाबेथ मुलगी १४ वर्षांची. इरनमेरी लुइस मुलगी १२ वर्षांची, अर्नेस्ट लुइस मुलगी १० वर्षांची, व विक्टोरिया ए एच एल बी मुलगी ६ वर्षांची अशीं ५ मुलें आहेत. फ्रेडरिक विलियम ह्मणून एक मुलगा सन १८७० सालीं यांना झाला होता तो ३ वर्षांचा होऊन मरण पावला व शेवटची मुलगी मेरि विक्टोरिया ही च्यार वर्षांची होऊन मरण पावली.

टेम्स नदीमध्यें आगबोट बुडून नुकतीच कित्येक मनुष्यें मेलीं त्यांच्या बायका मुलांच्या तजविजीकरितां प्रिन्सेस अलाइस यांनीं फार कळकळीनें फंड जमविण्याची तजवीज आपल्या पुढारी पणानें केली होती. व त्या भाषणें चांगलीं करीत असत. त्यांचें मरण ऐकून कोणालाही दुःख झाल्या वाचून रहाणार नाहीं.

## वऱ्हाडच्या सर्व्हे खात्याबद्दल सरकारचा अभिप्राय.

१६ वे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें रेसिडेंट साहेबांचा नंबर १८५चा जाहिरनामा या खात्याचे संबंधानें प्रसिद्ध झाला आहे तो येणेंप्रमाणें:—

वऱ्हाड सर्व्हे खात्याचा शेवटचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला आहे त्यांत त्या खात्याचें काम पुरें झालें आहे व आतां तें खातें बंद केलें आहे याजकरितां रेसिडेंट साहेबास अवश्यक वाटतें कीं आरंभापासून अखेरपर्यंत हें महत्वाचें काम चांगल्यारीतीनें झालें सबब तें करणारे कामदाराची प्रसिद्ध रीतीनें तारीफ केली पाहिजे.

वऱ्हाडसर्व्हे ही दक्षिण महाराष्ट्र देशच्या सर्व्हेची शाखा होती. व तिची सुरुवात सन १८६१ चे मार्च महिन्यांत मेजर अंडरसन साहेब सुपरिंटेंडेंट यांजकडून मलकापुर तालुक्यांत प्रथम झाली. सन १८६३।६४ सालीं वऱ्हाडांतील सर्व्हेखातें पृथक केलें. तेव्हां कर्नल अंडरसन साहेब हे सर्व्हे कमिशनर झाले. व क्या० एलफिस्टन साहेब यांस सुपरिंटेंडेंट नेमिलें. कर्नल अंडरसन साहेब यांची देखरेख उत्तम होती व तीमुळें या खात्यास फार फायदे झाले. ती देखरेख सन १८७१चे जुलै महिन्यांत संपली. पुढें सन १८७२ च्या आक्टोबर महिन्यापर्यंत मेजर एलफिनस्टन साहेब यांची चांगली नजर होती तेही हिंदुस्थानांतून गेले. तेव्हां राहिलेलें काम पुरें करण्याचें डिपुटी सुपरिंटेंडेंट मि. बेनन साहेब याजवर पडलें. त्यांणीं मागील कामदारांच्या नमुन्याप्रमाणें पुढें काम चालवून सर्व्हे पुरी केली. सबब त्यांचे, वरील उभयतां कामदारांचे, आणि त्यांत मदतीस असलेल्या इतर कामदारांचे सरकार आभार मानितें.

वऱ्हाडांतील मोजणी, प्रतवारी आणि दरठरोती हीं सर्व मुंबईच्या सर्व्हे खात्याच्या नियमाप्रमाणें आणि तत्वाप्रमाणें झालेली आहे. मेळघाट खेरीज करून साऱ्या वऱ्हाड प्रांताच्या सर्व्हेस एकंदर खर्च रुपये २११०९४६ लागला. आणि ही सर्वे झाल्यानें जमीनबाब जमाबंदी वार्षिक वसूल १५१२००३ रुपयेवाढला; ह्मणजे शेकडा ६९ रुपये वऱ्हाडच्या जमीनीचें उत्पन्न वाढलें.

या खर्चावरून हें सर्व्हेचें काम फायदेशीर व माफक दरबंदीचें झालें आहे. उत्पन्नांत जी वाढ झाली ती सऱ्याचे दर वाढवून झाली नाहीं. बिनमोजण्याच्या पुष्कळ जमीनी लोक वहिर्तीत घेत होते व त्याजबद्दल सरकारसारा देत नव्हते त्या सर्व उपगण्यांत अल्या व त्यामुळें जमीनबाब वाढली असें दिसून येतें.

रेसिडेंट साहेबांस भरवसा आहे कीं हिंदुस्थान सरकारही वऱ्हाड सर्व्हेच्या या कामाची चांगली तारिफ करील.

या जाहिरनाम्यासोबत मि. बेनन साहेब यांचा कमिशनर साहेबांस रिपोर्ट आहे त्यावरून समजतें कीं वऱ्हाडांत एकंदर मोजणी ६,०५२ गावची झाली. ते गाव ६६२०७५३ रुपये आकाराचे होते. व त्या खालील जमीन १०३२७७३७ एकर मोजली गेली. व तितकीची प्रतबंदी होऊन तिला नवीन दर लागले. सर्व्हेखात्याचे काम व वऱ्हाडांत ता. १ नोवेंबर सन १८७७ इसवी रोजीं पुरें घालें व तेव्हांपासून या सालच्या नोवेंबर महिन्याच्या अठरावे तारखेस अखेर रिपोर्ट होई पावेतो सुपरइंटेंडेंट यांच्या पगाराबद्दल २०३३८ रुपये व त्यांच्या इस्टाब्लिशमेंटाकरितां रुपये ८१८९ खर्च झाले.

खातें पुरें होताच रिपोर्ट झाला असता तर हा पुढचा एक वर्षाच्या पगाराचा मोठा खर्च वऱ्हाडावर पडला नसता असें आह्मांस वाटतें.

## कृष्णाकुमारी काव्य.

(ता. २४ नों चे अंक. पुढें चालू)

श्लोक.

धिक्कार सोसिल तुलाचि हा नृपा,
तुझ्या पतित्वें मज आणिली त्रपा ॥
"पठाण दे भीति, ह्मणोनि तु भिशी,
येणें स्ववंशास कलंक लाविशी" ॥९३
निंदूनि ऐसें बहुधा धवातें,
विलोकि कन्यामुख तेधवा तें, ॥
फोडी पुन्हा हंबरडा ममत्वें,
तेव्हां नगा स्थैर्य अचेतनत्वें ॥९४
ऐसें अरिष्ट जरि ये तरि राजकन्या।
भ्याली न त्यास, दिसली बहु हृष्ट अन्या॥
मातेसि ती समजवी, "रडशी कशा गे?
त्या नाहिं हेतु, असला तरि तूंचि सांगे ॥९५
दुःखांत होय ह्मणुनी मज मृत्यु इष्ट,
सप्राण भासति मला रिपुंचि दुष्ट,
कोणी सुता रजपुताचि न मृत्युस भी,
तो बालमित्र अमुचा अतिसख्य लोभी ॥९६
सोळा पियानें मज आज वर्षें
संरक्षिलें लाड करोनि हर्षें ॥

सा

हा तो तयाचा उपकार आहे,
तूं हें मनीं शोधुनि सत्य पाहे ॥२९७॥
असें बोलत्ये तोंचि प्याल्या गरानें
तिला घेरिलें प्राणिरक्षा पगानें,
मति भ्रष्ट झाली, विवेकासि थारा
मिळना ह्मणोनीच तो नाय सारा २९८
तैसीच ती मग पळांत विचित्त झाली,
पाहे नभीं टकटका, मुख घालि खालीं ॥
डोळे पुन्हा गरगरा फिरवी, गळाली,
झोलेहि घे, फिरुनि य बहु एककालीं९९
पीर त्या गरासहि तिला न मारवे
ह्मणूनीच तें जरि तया न तारवे।
तरि आपली न अपकीर्ति हो असें
बुझुनी निघे परत वांतिऱ्या मिसे ३००
परहिंसनें स्वहित लोभ ज्या नरा ।
बुध निंदिती अधिक त्याचि पामरा ॥
ह्मणुनी पठाण अतिनीच हें गणा ।
पच सत्य, यहुनि विषा बरें ह्मणा ३०१
विष तें उलटे असें विलोकी ।
तंव का दुर्जन तो पडे न शोकीं ॥
मग तीस पुन्हांहि त्याच नारि ।
विष देती परि तें वमे कुमारी ३०२
असें जहर तीनदां
मारि दिलें तरी तें तिला
त्यजी, परि जयाचिया
कुहृदयास लाजे जिला ॥
अशा कठिण त्या स्त्रिया
त्यजिति ती न दुष्ट क्रिया
प्रवर्तक असें जया
अजितांगिग पापप्रिया ॥ ३०३ ॥
"विषदर्प न सोसवे मला हा,
मज भ्रांति श्रम दे, न पार दाहा॥
तुमचा कुतुकें विनोद राहो,
अजि माझे असु लौकरी हरा हो ३०४
विनवी करुणस्वरें अशी ती,
परि नाहीं करुणा न पापभीती ।;
असल्या कठिन स्त्रिया पुन्हा ही,
विष देती तिजला अपूर्व कांहीं ॥३०५॥
अफूचा नवा अर्क, कौसुंभ काढा,
यमाच्याच या दोन ज्या होत दाढा ॥
तयांचा तदा मेळ त्या हिंमवांगा
रुचे, त्या विषें सिद्ध इष्टार्थ झाला ३०६
देतां तें विष घेउनी कुमारिका
प्रार्थी जगज्जीवना
"बा आतां तरि लौकरी सफलता
दे या विषप्राशना"
देवा जाउनि यापरी शरण ती
प्याली विष प्रीतिनें
धीरांची अशि रीति जी श्रुत असे
ती दाविली ही तिनें ॥ ३०७ ॥
ज्या निद्रेतुनि कोणि ही न उठले
ती दीर्घ निद्रा तिला,
आली या विषसेवनें, लय तिचा
दैवें असा योजिला ॥
तीसाठीं जननी विलाप करि, आ
पाहोनि मैना तसे
रावेहो फलभक्षया विसरुनी
झाले तदा प्रेतसे ३०८॥
"कृष्णे तुझा मंचक हा रिकामा,
पाहोनि मी जाइन कालधामा ॥
त्वां पाळिलें हे पिक मोर रावे
पाहा करी क्रंदति दीनरवें ॥ ३०९ ॥
हरिण शिशु तुझा जो बागडे अग्रभागीं,
अचल लसुनि राहे जो तुझ्या गानरागीं ॥
कांस न बदसि, त्या तो गाळितो आसवेंगें
लवकरि कुरवाळी धरुनी त्यास वेगें ३१०
परांच्या हजाम्यावरी जें विराजे,
नयाला मृदुत्वें नवें लोणि लाजे ॥
तुझ्या त्या पदाची दशा काय आतां
कशी चालशी प्रेतमार्गांत माता ३११
तुझी पालखी, हा तुझा वेगु घोडा
तुझा हा रथ दैव, त्या नाहिं जोडा ॥
अतां कोण गे वाहनीं या चढेल
प्रजा पाहुनी शून्य यातें रडेल ॥३१२॥
म इयाविना सम तुला क्षणही युगाशीं;
अतांचि एकलि कशी बहु दूर जाशी ?॥
तूं थांब साहस नको करु मी निघाल्यें
अतां पुरे, गृहसुखें अतितृप्त झाल्ये३१३
( पुढें चालू. )

## वऱ्हाड.

सर सालरजंग साहेब दिवाण यांची प्रकृति श्रीनगर एथें एकाएकी बिघडली होती आतां बरी आहे.

चक्रवर्तिनी साहेबांची कन्या वारली या करितां सरकारी आफिसरांनीं तीन आठवडे सुतक पाळवें असा मु० सरकारचा जाहिरनामा झाला आहे.

वाशिमाकडून पत्र आल्यावरून कळतें कीं, खरिपाचें पीक बहुतेक बुडालें. जवारी सहा सात रुपये मण झाली आहे व रब्बाची पिकेंही चांगली दिसत नाहींत.

कैदी गुफताबर्शिंग जो रा. रा. गोपाळ खुशालराव वकील यांचे घरीं पोलिसानें धरला, त्याला दोन वर्षें सक्तमजुरी कैदेची शिक्षा झाली.

अकोल्याहून जऊन इंजिनियरिंग कालेजांत शिकत असलेले मि० मारुती हरी लोहार हे एफ. सी. चे परीक्षेंत पास झाले.

कमिशनर साहेबाकडून लढाईचा जाहिरनामा व तारेच्या बातम्या आह्मांस आल्या आहेत त्या स्वीकारून आह्मी त्यांचे आभार मानितों.

उमरावतीच्या स्मालकाज कोर्टाच्या रेजिस्ट्रारचे २०० रुपयाचे जागेवर कोणाची नेमणूक होती हें पहाण्याकडे पुष्कळांचें लक्ष्य लागलें आहे. रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर हल्लीं तेथें आफि० क्लार्क आफ धि कोर्ट आहेत त्यांनांही ती जागा कदाचित मिळेल असें ह्मणतात.

असिस्टंट कमिशनरच्या जागेवर हैद्राबादहून कोणी युरोपियन गृहस्थ क्या० मेकंजी साहेबांचे आप्त येणार असल्याची वार्ता आहे.

पुसदचे तहशिलदारीचें काम हल्लीं मि. खाजे बदरोदीन पहात आहेत. त्याच जागेवर मि. सफदरअली पोलिस इन्स्पेक्टर यास नेमणार असें ह्मणतात.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा. रा. भावाजी खंडेराव वकील यांचे चिरंजीव रा. रा. बळवंत भवानी दिवेकर हे या वर्षीं बी. ए. चे परिक्षेंत पास झाले तसेंच रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यांचे भाचे रा. रा. गोपाळ गणेश आगरकर हेही या वर्षीं बी. ए. झाले, हे दोघेही तरुण गृहस्थ एथील हायस्कुलांत प्रथम अभ्यास करून मुंबईंत कालेजांत गेले होते.

रा. रा. श्रीकृष्ण नरहर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर हे बदली झाल्या प्रमाणें वाशिमास जाण्याकरितां गेले रविवारीं एथें आले होते व सोमवारीं पुढें गेले.

मि. हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांचें कापसाविषयींचें ता. २६ नोवेंबरचें पत्रक छपून प्रसिद्ध झालें आहे त्यावरून माहिती कळते ती अशी.

उमरावती जिल्ह्यांत एकंदर पर्जन्य ४० इंच ६१ दोकडे पडला. कापसाची लागवड ५०१७६८ एकर जमीनींत आहे, व पहिला वेंचा सुरू झाला आहे.

वणी जिल्ह्यांत ४७ इंच ६२ दोकडे पाऊस पडला. कापसाची लागवड एकर २८१३४० जमीनींत. आहे वेंचणी चालू आहे.

इलिचपुर जिल्ह्यांत पाऊस ३३ इंच ६९ दोकडे. कापसाची २१०९०७ एकर जमीन. कापुस वेंचणीच्या बेतास.

अकोला जिल्ह्यांत पाऊस ४२ इंच ६ दोकडे. कापूस ५३९२३३ एकर जमीनींत. हंगाम चांगला.

बुलढाणा जिल्ह्यांत पाऊस ३४ इंच ८९ दोकडे. कापसाची लागवड एकर २७५२१६ जमीनींत. धान्य बऱ्या स्थितींत आहेत.

वाशीम जिल्ह्यांत पाऊस ५१ इंच ८८ दोकडे झाला. तिकडे २२२१०४ एकर जमीनींत कापूस आहे. कापणी चालू आहे.

रेसिडेन्सी आर्डरमध्यें सरकारी जाहिरात आहे कीं कोइननच्या ऐवजीं सिंकोना ह्मणून कुइननच्या सर्व गुणाचें औषध सरकारानें आपले बागांतून तयार केलें आहे तें कलकत्यास बोटानिकलगार्डनचे सुपरइंटेंडेंट यांजकडे मागितलें असतां पाहिजे त्यास विकत मिळेल. त्याचे दर येणेंप्रमाणें

सर्व लोकांना २० रुपयाला एक पौंडाचा जास्ती डबा मिळेल. सरकारी आफिसरास व २० पौंडाहून जास्ती घाऊक घेणारास १६॥ रुपये पौंड प्रमाणे मिळेल. दर डब्यास १२ आणे डाक हशील लागेल. किंमत रोख पाठवावी.

१६वे डिसेंबरचे रेसिडेन्सी आर्डरमध्यें इंडिया ग्याझेटचा उतारा छापिला आहे तो:—

मि० केशव महिपत खारकर अमरावतीच्या स्माल काज कोर्टाचे रेजिस्ट्रार यांस वऱ्हाडांत ५वे प्रतीचे सबस्टांटिव प्रो टेंपोर एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर ते च्यार्ज घेतील त्या दिवसापासून नेमिले.

एप्रिल महिन्यांत नागपुर प्रांत मुंबई इलाख्याकडे जाणार. चीफ कमिशनर मि. मारिस साहेब मुंबई कौंसिलांत जाऊन बडोद्याहून मि. मेलविल साहेब त्यांच्या जागेवर येणार व जु० कमिशनर मि० ग्रांट साहेब बडोद्यास त्यांचे जागेवर जाणार.

मौजे माळेगाव तालुके अकोट एथें पौष वद्य ५ ह्मणजे ता. १३ जानेवारी रोजीं देव मास्तर हैरी नारायण यांची यात्रा भरणार आहे. व दरसाल पेक्षां रोशनाई व आतशबाजी विशेष होणार आहे.

मि. फौलर साहेब ए. आसि. कमि. यांस तिसरे प्रतीचे माजिस्त्रेटचे व दुसरे प्रतीचे सिविल जडजाचे अधिकार दिले.

मि. महमद यासनखा अक्काची यास दुसरे प्रतीचे माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं उमरावतीच्या हायस्कुलांतील ४ विद्यार्थी म्याट्रिक्युलेशनमध्यें पास झाले. अकोल्या विषयीं आज प्रातः काळपर्यंत कांहीं कळलें नाहीं ह्मणून काळजी आहे.

मि० जे एच बर्नस एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस वऱ्हाडांत क्रिमिनल प्रोसिजर कायद्याचे २७ वे (अ) कलमांतील ६ वे रकमेप्रमाणें मुकदम्याची संक्षिप्त चौकशी करण्याचे अधिकार दिले.

मि० आर डी हेर साहेब असिस्टंट कमिशनर व फर्स्ट क्लास माजिस्त्रेट यांस मि० निकोलेटस साहेब स्माल काज कोर्टाचे जडज आहेत तोंपर्यंत रेल्वे माजिस्त्रेटचा अधिकार दिला. व तें काम करीत असतां क्रिमिनल प्रोसिजरचे २२२ वे कलमा प्रमाणें संक्षिप्त चौकशी करण्याचा अधिकार दिला.

मि० जी एफ प्रहोस्ट वऱ्हाडांतील फारेस्ट खात्याचे असिस्टंट कमिशनर यांस १ महिना ४ दिवसांची रजा मिळाली.

आह्मांस लिहिण्यास फार वाईट वाटतें कीं मि० ताजुद्दीन हुसेन साहेब असिस्टंट कमिशनर रजा घेऊन स्वदेशीं गेले होते तिकडे ते मरण पावले असें समजतें. हे गृहस्थ हुशार, नीतिमान, व फार सभ्य होते.

पुसदचे तहशिलदार मि० बाकरअली हे दोन आठवड्यांमागें वाशिमास मरण पावले. हे तीन चार महिने आजारी होते हे तरुण असून स्वभावानें चांगले होते व पुष्कळ दिवस वऱ्हाडांत असून स्पेशियल माजिस्त्रेटचेंही कित्येक वर्षें यांनीं काम केलें होते

रा. रा. विनयक विष्णु पेंडसे यास दर्यापुरास नायब तहशिलदार नेमिलें आहे.

## वर्तमानसार

काबूलच्या लढाईचा खर्च हिंदुस्थानावर आढूं घालूं नये असे लिहियेतप्या इंडिया कौन्सलपैकी तीन गृहस्थनाचें मत आहे. व थोडा फार आला असे दोन गृहस्थाचे मत आहे. बाकीचे स्तब्ध आहेत. कलकत्याहून ब्रिटिश इंडियन असोसियशन कडून विलायतेस लार्ड लॉरेन्स, लार्ड नार्थ ब्रूक मि. ल्यवडरटन व मि. फसेट यांस तारेतून निरोप गेले आहेत कीं "आपण अफगाणवार कमिटी नेमिल्याबद्दल आम्ही आभार मानितों. हिंदुस्थानावर लढाईचा खर्च घातल्याने लोक फार गांजले जातील. न्याय करितां आपण दाद लावावी. असे मागाहून येत आहे."

कुचबिहारचे तरुण राजपुत्र विलायतेंत आहेत त्यांणीं अशी इच्छा प्रदर्शित केली आहे कीं, अक्सफर्ड एथील युनिव्हर्सिटिमध्ये म्याट्रिक्युलेशनची परीक्षा पास होईतों आपण रहाणार.

आफ्रिका खंडांत मि० स्टीवर्ट नावाच्या गृहस्थाचें प्रेत स्मशान भूमींतून पुरले ठिकाणाहून कोणीं चोरून नेलें त्याचा पत्ता नाहीं. १०००० रुपये बक्षीसाची जाहिरात लावली आहे.

काश्मिरचे महाराज लाहोरास गेले आहेत. कपुरथळाचे राजे न बलपुरच नबाब हेही लाहोरास गेले आहेत.

एडिंबरो एथें एक आजारी दवाखान्यांत येनला. त्याला छतींत दुखणें खोकला व दमा हा आजार होता. दुखणें बरें न होतां एक महिन्यानें तो मेला त्याचें प्रेत फाडून पहातां फुप्फुसांत उजवीकडे एक बंदुकीची गोळी सापडली. मयताचें वय ६२ वर्षांचे असेन तो हिंदुस्थानांत बंडा. चे वेळीं सोल्जर होता त्यावेळेस त्याला गोळी लागली होती पण उपाया अंतीं जखम मिळून येऊन तो बरा झाला होता व आपली चाकरी करून पेनशन घेऊन तो घरीं बसला होता, त्याला त्या गोळीपासून निरंतर कांहीं इजा नव्हती पण हें मरण तीमुळेंच त्याला आलें. गोळीनें आंत घर केलें होतें. व तो फिरत होतो. तिच्यावर पांढऱ्या कांहीं कठीण पदार्थांचें वेष्टन झालें होतें व ती सजाअंस बजनाची होती.

पारीस एथील प्रदर्शनांत ज्या नाना प्रकारच्या वस्तु आल्या होत्या त्यांत एका गृहस्थानें आणलेल्या घड्याळांत ज्यावेळीं जितके तास वाजावयाचे असतील तितके तेव्हां बंदुकीचे आवाज होत.

राजकोटास ज्याप्रमाणे राजकुमार कालेज आहे त्याप्रमाणें कोल्हापुर एथें एक राजकुमार कालेज करण्याचे घाटत आहे असें समजतें.

फ्रान्स देशांतील सैन्यांत तेथील सरकारास प्रत्येक शिपायास सरासरी १९० रुपये सालिना खर्च येतो. जर्मन सरकारास प्रत्येक शिपायास सालिना १५० खर्च येतो. इंग्रज सरकारास विलायतेंत प्रत्येक शिपायास २८० रुपये खर्च येतो. व हिंदुस्थानांत प्रत्येक शिपायास सरासरी वर्षास ८५० रुपये खर्च येतो! हिंदुस्थानांतील नेटिव शिपायास खर्चाची सरासरी काढली असतां प्रत्येक शिपायास सालिना १०० रुपयां पेक्षां जास्ती खर्च येत नाहीं. नै. भा.

मुंबई एथें अमेरिकेंतील न्यूयार्क एथून तीन जहाजें आलीं आहेत. त्यांतून केरोसिन तेलाच्या ८४,५९३ पेट्या आल्या आहेत.

अमेरिकेंतील वर्तमानपत्रांत फक्त जाहिरातीं पासून ६० कोट रुपये उत्पन्न आहे.

या देशांत सिंकोना बार्क (जिचे कोयनेन होतें ती) बरीच उत्पन्न होऊं लागली आहे. मद्रास इलाख्यांतील सरकारी बागेतून ३९००० पौंड साल लंडनास पाठविण्याकरितां मद्रासेहून रवाना झाली.

श्री० गायकवाड सरकार यांचे वैशाख मासीं लग्न होणार याकरितां रा. रा. बाळासाहेब मान ऊर्फ काकासाहेब हे दक्षिण प्रांतांत मुली पहाण्याकरितां आले आहेत. त्यांनीं रा. रा. तात्या साहेब जाधव वाडीकर यांनी मुलगी पसंतीस आल्यावरून तिच्या तसबिरा व टिपण श्रीमंत जमनाबाईसाहेब गाईकवाड यांजकडे पाठविलें आहे.

गेल्या सालीं ब्रिटिश इंडियांत शहरे व खेडीं मिळून ९,९३,४४४ होतीं. जमिनीचा साधारण वसूल व स्थानिक कर मिळून २,२७,६४,१६४ होता. सर्व रेल्वे लैनीची एकंदर लांबी ६,२१४ मैल होती. सिंकोनाच्या सरकारी मळयांत एकंदर ३८,१७,१९२ रोपे होते पैकीं १० मळयांतील रोप्याचें २,९९,९७,४८२ पौंड उत्पन्न होतें व बुंदाचें उत्पन्न ३,१६,९९,४९९, पौंड होतें. या देशांत गेल्या सालीं एकंदर ९३ कापसाच्या गिरण्या चालू असून त्यांचें नांवाचें भांडवल एकंदर ९,३२,१६,००० रुपये होतें. तागाच्या गिरण्या २१ होत्या व त्यांचें भांडवल २,२९,४८,९०० रुपये होतें. इं. प्र.

गवरनर साहेबांची स्वारी गेले रविवारीं ठाण्याकडून जलमार्गानें वसईचा किल्ला पहाण्यास गेली होती. वसईचा किल्ला पाहून याच दिवशीं स्वारी मुंबईस परत येऊन सोमवारीं काठेवाडाकडे फिरण्यास गेली.

हल्लीं पार्शी जातीच्या स्त्रिया पुष्कळ कसबिणी होऊं लागल्या त्या न व्हाव्या म्हणून सुमारें २००० पार्शी लोकांनीं सह्या करून एक अर्ज सरजमशेटजी जीजीभाई बारोनेट व पार्शी पंचायत फंडचे इतर ट्रस्टी यांजकडे गेले बुधवारीं पाठविला असें समजतें.

पृथ्वीवर ज्या कापडाच्या गिरण्या आहेत त्यांत सर्वांहून मोठी गिरणी युरोपांत रशिया देशांत नारवार एथें आहे या गिरणींत ४ लक्ष चात्या आहेत.

मिळकतीचें नवीन खातें.— रिकामी किंवा नवीन होणारी जागा मिळण्याविषयीं जे अर्ज येतील त्यांत प्रत्येक अर्जा बरोबर आठ आणे फी असल्याशिवाय ते घतले जाणार नाहींत असा मद्रास रेव्हेन्युबोर्डानें हुकूम केला आहे.

---

## एकांतवास

मान विष हेतुस्तव मनुष्य एकांताचा आश्रय करितो. परंतु धर्मपरायण जो मनुष्य, ज्यास पवित्रता म्हणजे मूर्तदेवता होऊन गेली आहे, त्यास एकांतस्थल जसा रमणीय व प्रिय वाटतो तसा दुसऱ्या कोणाला ही वाटणार नाहीं. धन दौलत, आप्त, इष्ट, मित्र, मुलें, एकदम त्यागून, एकादा विविक्त वनांत किंवा गंगेच्या कांठीं किंवा पर्वताचे दरींत फल पत्रें; कंद मूळें ह्यांवर निर्वाह करून एकटा आध्यात्मिक ज्ञानामध्ये तो निमग्न असतो. अशा प्रकारच्या यतींची सर्वत्र ख्याति आहे.

सर्वसंगपरित्याग करून अरण्यादिकांत जाऊन खुशीनें रहाण्याचें कारण काय अशी पृच्छा सहज उत्पन्न होते. तर आतां संक्षेपें करून तिचा निर्णय असा:— वत्सल मातापितरें, प्रिया जाया, सुकुमार मुलें इतर जन किंवा ऐश्वर्य, यांचा त्यास कंटाळा यतो असें मुळींच नाहीं. भयंकर काळोख्या रात्रीं व त्यांच्या ठायीं येणारे अपाय, हिंसक श्वापदें आणि सर्व प्रकारें गैरसोय हीं त्यास लोकवस्ती व तींतील सुख यांपेक्षां गोड तर वाटत नाहींत, एक नाइलाजास्तव तो जनवस्ती सोडून जातो. त्याचें अंत:करण व बुद्धी हीं अतिनिर्मल असल्यामुळें त्यास अपवित्रता दु:सह होती. त्यास मनुष्य दिकांचा वीट नाहीं पण पापाचा तिटकारा येतो. तो पापास भीत नाहीं पण त्याच्या दर्शनाचा तिरस्कार करतो. कपट, व्यभिचार, घात, कलह सर्व प्रकारचा अधर्म आणि मनुष्याचें निंद्य आचरण हीं त्यास हिडिस वाटतात. सर्व दुनिया दुराचार व नास्तिक बुद्धि यांहीं त्यास भरलेली दिसती आणि स्वत: तो काया वाचा आणि मन यांहीं करून शुद्ध तेव्हां तो आपल्या मनाला मिळून असेल असें पवित्र स्थल व मनोहर वस्तु यांचा आश्रय करूं इच्छितो. हा कल स्वाभाविक आहे. आणि ज्या अर्थीं त्याचें मन देवाच्या मनासारखें शुद्ध व जनरत नरकवत त्या अर्थीं एकांताशिवाय त्याला जागाच उरली नाहीं. तेथें सर्वच त्यास पवित्र व निर्दोष दिसतें. विस्तीर्ण शुभ्र नभोमंडळ, गिरि गव्हरें, नद्या नाले, पशु पक्षी आणि शांत वनें हीं सर्व शुद्ध आणि संतोषकारक होतात. बालार्क, प्रात: कालची इतर शोभा, पक्षीगायनाचें माधुर्य हीं त्यास आल्हादक होतात. निर्वात स्थळ, शांत रात्र पूर्ण चंद्रमा, सोज्वल चांदणें, आणि सौम्य सुंदर नक्षत्रें ह्यांच्या रमणीयतेनें त्याचें अंत:करण प्रसन्न असतें. आपण केवळ नंदन वनांतच आहे असें त्यास वाटतें. ह्या विशाल बाह्य सृष्टीची पवित्रता आणि त्याच्या आत्मसृष्टीची पवित्रता ह्याची जेव्हां एकरूपता होते तेव्हां तो नेत्र संमीलित करून ब्रह्मानंद अनुभवतो आपल्या शुद्धी नरूपी प्रकृत स्वभाव नासून मनुष्य नीं ज्या पापराशी केल्या आहेत त्या त्याच्या नजरेस तेथें मुळींच पडत नाहींत. आणि अहोरात्र विश्व मध्यें जें कांहीं त्याच्या दृष्टीस पडतें तें विश्वकर्त्यानें जसें निर्मिलें आहे तसेंच असतें. विश्वाचा मूळचा पवित्र स्वभाव त्या ठिकाणीं सर्व भूतामध्यें पहून त्याचा अंतरात्मा सुप्रसन्न होतो.

ह्या विशाल विश्वाची भव्यता, वैभव, शोभा आणि पवित्रता ह्यांवरून तें परमेश्वरास गोमंण्यासारखेंच उपवन आहे. आणि म्हणूनच यति त्यास मोहित होतात. परंतु हें देवाचें बाह्य ज्ञान हें त्याचें क्रीडापवन, पण त्याचें देवालय, वसतिस्थान, ज्या मध्यें आहे असें उपवन म्हटलें म्हणजे भक्ताचें शुद्ध चित्त होय. ज्या संताचें ठायीं धर्म, त्याग, शीलता, दाक्षिण्य, तप, अनुष्ठान, परोपकार, क्षमा, दया, शांति हीं वास करितात तो दैवी पुरुष. त्यास देवाचा अवतार म्हणण्यास चिंता नाहीं. अशा चित्तपवनाचें सौभाग्य अखिल विश्व आणि सहस्त्र वधि नंदनवनें ह्यांच्या सौभाग्यापेक्षां जास्त आहे. आणि अशाच प्रकारची जर सर्व दुनिया होईल तर कोण्याही यतीला तिचा सहवास टाकून आमरणांत एकांतांत रहावें असें कधींच वाटणार नाहीं. ह्या सारिखें मनुष्य कुटुंब त्याला एकांतापेक्षां सहस्त्रपट प्रिय वाटणार आहे तर मग नीट रीतीनें विचार केला असतां मनुष्याचा कंटाळा नव्हे तर त्याचें घोर पापच साधूत एकांतांत दवडतें असें स्पष्ट दिसून येईल.

धर्मामध्यें ज्यांची बुद्धि स्थिरावलेली नाहीं त्यालाही एकांतवास अवश्य आहे. लोभ आणि मोह यांत वास करीत असतां पूर्ण आणि स्थिर धर्मपरायणता प्राप्त होणें विरळा ज्या प्रमाणें आपल्या आत्मपवित्रते सारखीच विश्वामध्यें पवित्रता पाहून साधू संतोष पावतात त्याप्रमाणेंच पापी मनास व ह्या सृष्टीची पवित्रता व आपण बुद्धया केलेली आपल्या आत्म्याची विटंबना पाहून विषाद झाल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि ह्या विषादापासून त्यांस बोध होतो. ह्या अशुद्ध विश्वामध्यें जगदीश्वरानें जर अशी प्रसन्नता उत्सव, पवित्रता, व शोभा हीं ठेविली आहेत तर मग आपल्यासारिखा बुद्ध आत्मा विशेष पवित्रतेस व योग्यतेस पात्र केला आहे ह्या विषयीं ते जागृत होतात आणि ह्या अतुल भगवद्दत्त अनुग्रहाचा आपण मोहास्तव अनादर केला असा त्याला मोठा अनुताप होतो. आणि पदोपदीं सर्व वस्तूंचें निर्दोषत्व पाहून आत्मसृष्टी निष्कलंक करण्याच्या कामीं लागतात व भक्तवत्सल परमात्मा त्यांस सहाय्य करितो.

धर्मजागृति व तच्छिक्षण ह्यांला एकांत कोठीं अशीं उत्तम स्थान खरें पण धर्मात्म्यांनीं आपला सर्वकाल तिकडेच घालविणें हें उचित नाहींत. जन पापी खरा पण त्याचा उद्धार करण्याचें काम देवानें बऱ्याच अंशीं धर्मात्म्याकडे सोपविलें आहे देव कोणालाही टाकीत नाहीं. मूल अज्ञानी व हट्टी म्हणून आई त्यास सोडून जात नाहीं. मांडीवर बसवून स्तनपान करून त्यास वाढवितें. धर्मात्मे ह्यास देवानें अज्ञानी लोकांच्या दाई नेमिलें आहे. म्हणून त्यांनीं अज्ञ लोकांकरवीं बोधरूपी दुग्धपान करवून त्यांची आत्मोन्नति करावी ही त्यांत परमवत्सल जगदंबेची आज्ञा आहे. ती पाळून त्यांनीं देवाची योजना सिद्धीस नेणें हा त्यांचा धर्म आहे. सु. प.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २९ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी. अंक ५२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ०१०१ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरखबर.

वऱ्हाडसमाचार छापखान्यात खालीं लिहिलेले जिन्नस व पुस्तकें विकत मिळतात.

| | किंमत. |
|---|---|
| गजकरणाच्या डब्या | ०१ |
| भ्रांतिकृत चमत्कार अथवा कामेडी आफ एरर्स | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| कुटुंबमंत्री | ०६ |
| नवीन दिवाणी कायद्यावरील सर्क्युलरें | ०६ |

## जाहिरात.

### वैद्यसुधाकर

हा नवीन ग्रंथ शिळा छापावर छापून विक्रीस तयार झाला आहे यांत वैद्यक संबंधीं सर्व अवश्यकतेचे व अनुभवशीर विषय असून सर्व ठिकाणीं मिळण्यासारख्या अशा सुलभ औषधांची योजना झाली आहे यांतील सारांश येणेंप्रमाणें- कोश, नित्यवर्तनक्रम (यांत मनुष्यानें प्रातःकाळपासून निजेपर्यंत कसें वर्तावें), स्त्रियांचा ऋतुकाल, शुक्र व स्त्रीरज यांचीं लक्षणें, गर्भिणी स्त्रीचीं व गर्भाचीं लक्षणें, डोहाळ्यावरून गर्भिणीचे व गर्भाचे नियम, अष्टविध परिक्षा (नाडी इ.) व सामुद्रिक लक्षण, वैद्यास सूचना, औषधी आणावयास, तयार करण्यास व देण्यास मुहूर्त, रोग्यास स्नान करण्यास मुहूर्त, औषधी आणावयाचा प्रकार. औषधीं युक्ता युक्त विचार, औषधादिकाचें मान, औषधी प्रतिनिधी, औषध सेवनकाल, सहा रसांचे गुण, देशकाल लक्षण, वायु, पित्त, कफ यांचा प्रादुर्भाव, औषधें घेण्याचा प्रकार, देशमनाचा प्रकार, ओकारी व ढाळाचा विधी. धातु पुष्टीची व कामोत्पत्ताची औषधें, तऱ्हतऱ्हेचे पाक, चाटणें, चूर्ण, मात्रा, रस, गोळ्या, धातुचीं भस्में करण्याचा प्रकार, यंत्राच्या आकृति, अनुपान प्रकरण, प्रत्येक खाण्याचे जिनसांत (भाजी पाला फळफळावळ इ०) गुणदोष काय आहेत त्यांचे स्पष्टीकरण, सोमल, सर्प, कुत्रें, उंदीर, विंचू, वगैरेच्या विषावर तर फारच उत्तम योजना झाली आहे. सर्व रोगांवर औषधी व पथ्यापथ्य या एकाच ग्रंथाच्या संग्रहानें अनेक ग्रंथाचें श्रय येणार आहे यांत संशय नाहीं. ह्याची किंमत एक रुपया चार आणे पोष्टेज व डाक १ आणा अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत पाठविल्यास तत्पुस्तक तात्काळ रवाना केलें जाईल. कळावें तारीख १८ माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

रंगनाथ सखाराम लाळे किकाविकर.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

## सूर्यग्रहण.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० खालील मजकुरास मेहेरबानी करून स्थल द्याल अशी आशा आहे. ह्या आमच्या हतभाग्य देशांत अलिकडे कोणी विद्येचा उत्कर्ष करणारा, किंवा ह्या सृष्टींत जे जे चमत्कार दृष्टीस पडत त त्यांचा शोधानें विचार करणारा, प्रायः राहिला आहे असें वाटत नाहीं. सूर्यसिद्धांत होऊन किती वर्षें झालीं हें तर कोणास समजतच नाहीं, परंतु सिद्धांतशिरोमणीस आज ८०० वर्षांवर, आणि ग्रहलाघवास ३०० वर्षांवर काळ होऊन गेला; तथापि अलिकडे कोणी प्रत्यक्ष वेध घेऊन ते ग्रंथ बरोबर आहेत किंवा कसें ह्याचा शोध केला नाहीं. ज्योतिष विद्या बरोबर समजण्यास ग्रहांचे वेध वारंवार केले पाहिजेत, आणि ते वेध करण्यास बहुतोलाचीं सूक्ष्मयंत्रें पाहिजेत, व वेधकर्ता मोठा बुद्धिवान् व गणिती पाहिजे, असें साहित्य असल्याशिवाय ती विद्या वाढत नाहीं. भास्कराचार्यानंतर ह्या देशांत आजपर्यंत दुसरा कोणीही शोधक ज्योतिषी झाला नाहीं. उलटा ह्या विद्येचा र्‍हास मात्र होत चालला आहे. पुढें गणेशदैवज्ञ ह्मणोन चांगले गणिती झाले, त्यांनीं सोप्या युक्ती बसवून ग्रहांचे गणित सुलभ केलें; परंतु ह्यापासून दोन वाईट परिणाम झाले. एक हा कीं ज्या मानानें गणित सुलभ झालें, त्या मानानें तें स्थूल होऊन त्यांतील सूक्ष्मता कमी झाली, आणि तेणेंकरून पुढील चुकीचा पाया पडला. दुसरा परिणाम हा कीं. गणित सोपें झाल्यानें सिद्धांत ज्योतिष शिकण्याचा व वेध करण्याचा प्रचार नाहींसा होऊन, शास्त्राच्या मूळ सिद्धांताचें ज्योतिषास ज्ञान नाहींसें झालें, हा परिणाम पहिल्यापेक्षांही विशेष वाईट आहे. हल्लीं आमचे देशांत ज्योतिषी ह्या नावानें प्रसिद्ध आहेत त्यांतून बहुतेकांस बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार ह्याशिवाय दुसरें काहीं माहित नसतें. बीजगणित; भूमिति, शंकुछिन्न, शिल्पशास्त्र, शून्यलब्धि गणित, वगैरे विषयांपैकीं कितीएकांचीं नावें त्यांनीं स्वप्नांत देखील ऐकिलीं नसतील. गणित करतांना क्रांतिवृत्त, कक्षा, विक्षेपवृत्त दृक्कर्मदत्त ग्रह, शिघ्रिनीचे स्पवृत्त, शीघ्रफल, मंदफल वगैरे जे शद्ब येतात त्यांचा अर्थ काय हेंही थोड्यांसच माहित असेल. तेव्हां आमच्या ज्योतिष्यांपासून ह्या विद्येचा उत्कर्ष काय होणार आहे? हल्लीं जीं पंचांगें छापिलीं जातात तीं ग्रहलाघवावरून केलेलीं असतात. परंतु ग्रहलाघवावरून जे या देशांत गणित करितात व त्यावरून ग्रहणाचे स्पर्श मोक्षकाल आणितात ते बरोबर मिळत नाहींत. ह्या विषयीं मी पूर्वीं अनुभव घेतलेला आहे. व आर्यपक्षाचें गणित बरोबर मिळतें असें मला वाटतें. व माझेच मताप्रमाणें विश्वनाथ दैवज्ञाचेंही ह्मणणें आहे तें येणेंप्रमाणें:—

श्लोक.

यातेद्विग्रहलाघवस्यधरणि
क्षंणीसपक्षान्वित,
संवीक्ष्यक्षगदाकरोष्णकरयोः
पर्यायपक्षाश्रितं ॥
क्षत्रानु ध्रुवकानु दृग्गणम्
तुंगा द्रुत नुमा दिकन्
दृष्टिप्रययकारण द्रुणितावि-
विद्धविश्वनाथ ब्रुवं ॥ १ ॥

अर्थ—ग्रहलाघवास २११ वर्षें झाल्यावर चंद्रसूर्याचीं ग्रहणें दृष्टिगोचरतेस बरोबर न मिळत ह्मणून, विश्वनाथ दैवज्ञ यांनीं रविचंद्रउच्च यांचे ध्रुवकक्षेपक आर्यपक्षानी मिळण्यासाठीं नवीन कल्पून ग्रहणें साधलीं. ह्या प्रमाणावरून व प्रत्यक्ष अनुभवावरून ग्रहलाघवांत फेर आहे व आर्यपक्षाचें गणित बरोबर मिळतें ह्यास्तव पुढें येणारें ग्रहण पौष वद्य ३० रोजीं तें आर्यपक्षाचे मताप्रमाणें केलें आहे. त्याचे स्पर्श मोक्षादि काल खालील कोष्टकांत दाखविले आहेत. व छापील पंचांगांत घ. २६ प. २३ नीं ग्रहण लागणार व घ. ३१ प. २९ ह्मणजे रात्रौ सुटणार असें लिहिलें आहे. ह्यास ग्रस्तास्त असें ह्मणतात. रा. रा. केरो पंत छत्रे यांचे छापील पंचांगांतही असें आहे कीं, अस्तमानानंतर ग्रहण लागणार व तें रत्नागिरीचे पश्चिमेस निरभ्र असतां दिसेल असें लिहिलें आहे. व चहु पंचांगकर्ते यांचे छापील पंचांगांत ग्रहण मुळींच नाहीं ह्यास्तव सर्वांस आमची प्रार्थना आहे कीं, मी केलेल्या गणिताकडे सुज्ञांनीं लक्ष पुरवावें व ज्यास वाटेल त्यांणीं करून पहावें व ग्रहणाचे दिवशीं प्रत्यक्ष अनुभव घ्यावा ह्मणजे खात्री होईल. आर्यपक्षाचे गणितमानानें सूर्यास्तमानापूर्वीं घ. १ पळे ३४ नीं ग्रहण सुटणार तेव्हां रवी भोजन करण्यास प्रतिबंध नाहीं. भुसावळेस मद्रासटैम प्रमाणें ग्रहणाचे दिवशीं रविउदय ६ वाजून ५९ मिन्यटांनीं होणार व अस्त ६ वाजून १ मिन्युटानीं होणार आहे हें सर्वांस कळवें. तारीख १२ डिसेंबर सन १८७८ इसवी. मुक्काम बोदवड तालुके भुसावळ जिल्हा खानदेश.

भाऊ राजाराम जोशी
बोदवडकर.

पौष कृष्ण ३० बुध सूर्यग्रहण तारीख २२ जानेवारी सन १८७९

| | | स्प.का. | म.का. | मो.का. | प. का | ग्रास | शेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आर्यपक्षावरून | घ. | २२ | २४ | २६ | १ | २ | ९ |
| | प. | ४३ | ७ | ५० | ७ | ११ | ६ |
| मद्रासटाइम | कलाक | ३ | ४ | ५ | १ | २४ | ७६ |
| भुसावळ. | मिन्यटें | ५८ | ३१ | ११ | १४ | ० | ० |

## कृष्णाकुमारी काव्य.

(मागील अंकावरून पुढें चालू)

श्लोक.

तिच्या पाहुनी ती विनोदस्थ्यातें
रडे पापरी ऊर ताडोनि हातें ॥
सुचेना कधीं तीस खाणें पिणें वा,
ह्मणे सर्वदा काय दें होय दे। २१४
मूर्छा तिला ये अतिशोकतापें,
पाने दिवा रात्रहि ती न झांपे ॥
तेणें तिनाही लय शीघ्र झाला,
नाहीं दया हो प्रतिकूल काला ॥२१५॥
दुर्दैवपाक पसरे भुवनीं असा हा,
तेव्हां सशोक करिती जन सर्व हा हा ॥
झाला पठण आणि हस्तक तो तयांला,
निंदेस पात्र, फळला धनलोभ पोला
कुमारीची हत्या
करुनि जग सारें रडविलें,
जयानें या पापें
त्रिभुवनपियाला चिडविलें
पठाणा तो बोले
मग अजितसिंगा स्मृतिधरा
अतां अज्ञ झालो
सकल ह्मणुनी उत्सव करा २१०
अनेकविध युक्तीनीं यश तुझा
मिळालें असें,
मलाहि कृतकृत्यता तुमचिया
प्रसादें असे
पठण अपुल्यावरी करिल तो
दया यास्तव
पयत्न करि पापरी परि न या

रुचे हा स्तव ॥ ३१८ ॥
पठाण तो क्रूर यमापरी जरी
तरी कुमारीवध ऐकिल्यावरी ॥
त्याच्याहि नेत्रांतुनि अश्रु पाझरे
वधीं कन्याला फुटती नसे झरे ३१९
ज्याची बुद्धी पातकाचीच खाण
पश्चात्तापा तोहि पावे पठाण
या हिंसेचा होय जो कारभारी
दुःशब्दांनीं त्यास तो ठार मारी ॥३२०॥
"अरे दुष्टा नीचा
तुज आजितशिंगा करवलें
कसें हें या कर्मे
प्रकटचि तुझें चित्त चवलें ॥
पहा शूरा भामी
सकल रजपूतासि पुजिती
तुला मूढा झाली
कशि सुसह लोकांत फजिती ॥३२१॥
ज्याला जाति कुलाभिमान न असे
धिक् त्या तुलारे असो
ऐशाच्या मुखदर्शनें सुख नया
तोही जगीं या नसो
वंशीं जन्मुनि या तुवा तुडविलें
पित्रादिकांच्या यशा
या कर्मे तुज कां न येइ सहजया
श्वानापरी दुर्दशा ॥ ३२२ ॥
पिसाळलेल्या कुतऱ्यास जैसें
न मारितां पाप, म्हणोनि तैसें ॥
कोणी तुला मारिल टोणपूनी,
तूं रहासी गुप्त जरी जपोनी ॥३२३॥
लुच्च्या म्हटलें तुला जरी छू,
तरि त्वां दुष्कृत हें नयेचि इच्छू॥
जरि तूं वदल्यासि सद्विचारें,
तरि हा डाग मला न लागितारे ३२४
माझ्या चित्तीं अंकुरे पाप बीज,
त्याला, तू तें बोलिलो "तोय पाज?"
तसें त्वां त्या पोशिलें दुर्विचारें,
तेणें दुःखी जाहले देश सारे ॥ ३२५ ॥
दुर्नितीसचि सहाय पोशिलो,
कुंभिपाक नरकांत तो शिजो ॥
नीचता मज तुवांचि हें दिली,
आणिं साधुहृदयेंहि भेदिलीं ॥ ३२६ ॥
अशि निंद्य करी तुला कृती,
रजपुता रुचली, न आकृती ॥
मज दाखवी आपली आतां,
न मला ये तुज अन्य सांगतां ॥ ३२७ ॥
पाजी शौर्यविहीन जो नर तया
ऐसें रुचे कर्मरे,
जा तूं घेथुनि, तोंड दावि न पुन्हा
क्रोधाचिया निर्भरें ॥
ऐसें त्यास अमीरखान चिडुनी
धिक्कारि, तेव्हां तया,
देईना धरणीहि ठाव, इतरा
येईल कैशी दया ॥ ३२८ ॥
या पापाचें फळ अतिकटू
त्यास ये त्याच देहीं,
त्यातें प्रेमें न निरखि कधीं
पुत्र वा बायकोही ॥
या चिंतेनें अधिकचि मुखीं
कालिमा ये, तयाची
झाली नष्ट व्यसन शतकें
वासना जीवनाची ॥ ३२९ ॥
तो भीमसिंग नृपति निजकन्यकेच्या
घाता प्रर्वतवि तया, म्हणुनीच त्याचा ॥
धिक्कार त्या न करवे, परि अंतरंगीं
त्याच्या भिडे, 'अनय वृत्त वधोनि' संगीं
(पुढें चालू.) ३३०

# वऱ्हाडसमाचार

मिति पौष शुध्द ६ शके १८००

## सिव्हिल सर्व्हिस.

विलायतेंत सर आर्स्किन पेरी साहेब यांनीं नाइंटिथ सेंचरी नांवाचे पत्रांत लिहिलें आहे कीं नेटिव लोकांस सिव्हिल सर्व्हिसच्या जागा देण्याचे कामीं आजवर सरकारानें बराच हात आखडून धरिला आहे पण त्याविषयीं हल्लीं लार्ड क्रानब्रूक साहेब स्टेट सेक्रेटरी यांणीं मनन करून हिंदुस्थान सरकारास एक डिस्प्याच पाठविला आहे व त्यांत नेटिव लोकांस सिव्हिल सर्व्हिसच्या जागा मिळण्याविषयीं सोय केली आहे. ही गोष्ट खरी असेल तर मोठी संतोषाची आहे. मूळ सन १८२२ सालीं पार्लमेंट सभेनें या कामास संमती दिली पण त्या गोष्टीला आज ४५ वर्षें होऊन गेलीं. ती गोष्ट धिरें धिरें चालली आहे. सिव्हिल सर्व्हिसचे परीक्षेस नेटिव लोकांचे वयाची यत्ता सरकारानें फारच कमी ठेविली आणि एक साल हिंदुस्थानांत ही परीक्षा होत नाहीं म्हणून इकडील लोकांनें कित्येक वेळा अर्ज गेले पण सरकारनें मनावर घेतले नाहींत. इंग्लिश लोकांत व इंग्लंड देशांत त्यांजमध्यें मिसळून नेटिवांनीं राहिल्याशिवाय त्यांस चांगलें ज्ञान येणार नाहीं अशावर ही गोष्ट आजपर्यंत राहिली. आतां याविषयीं हल्लींच्या डिस्प्याचमध्यें स्टेट सेक्रेटरी साहेबानीं चांगला विचार केला असेल तर उत्तम होईल. हिंदुस्थानांत उतम अभ्यास करून विद्वान् पुरुष अलिकडे पुष्कळ विख्यातीस येत आहेत व सर सालरजंग, सर माधवराव यांसारखीं अमूल्य रत्नें हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत शिकून तयार झालेलीं आहेत. हें युरोपियन लोकांनीं मनांत आणून हिंदु लोकांस सिव्हिल सर्व्हिसमध्यें जागा द्याव्या हें अवश्य आहे.

## व्यापाराची स्थिति.

प्रस्तुत कित्येक ठिकाणीं व्यापाराची स्थिति मोठी गडबडीची झाली आहे. विलायतेहून मोठमोठाल्या एक दोन व्यांकींचीं दिवाळीं निघाल्याचें वर्तमान आल्यावरून मुंबईस मोठी धांदल उडाली. ती इतकी कीं एका कंपनीचे शेराची किंमत सकाळीं ४७५ रुपये होती ती संध्याकाळाला २७५ रुपये झाली. दुसरे एके व्यापाराचे शेर २८५च्या भावाचे होते ते २२५वर आले. व तिसरे एके कंपनीचे १७५ चे १२५ वर आले. बाहेर देशांत सर्व व्यापार मुंबईचे सुत्रावर चालतो तेथें अशी स्थिति झाल्यावर चहूकडे धांदल होऊन जाईल यांत संशय नाहीं. या वर्षी अजून दुष्काळाचा संसर्ग सुटला नाहीं, कोठें लावणी झालीच आहे, कोठें सुरू आहे आणि व्यापाराची अशी पिछेहाट झाली तर मग पुढें कशी काय स्थिति होईल याविषयीं लोकांस मोठी काळजी आहे.

## उमरावतीची वक्तृत्व-सभा.

मागें जाहिरात असल्याप्रमाणें गेल्या गुरुवारीं उमरावतीस हा समारंभ सुरू झाला आहे. अकोल्याहून बरीच मंडळी गेली आहे. सोलापुराकडून रा. रा. विष्णु सखाराम उमरावतीचे माजी स्टेशन मास्तर व धोंडहून रा. रा श्रीधर बाळकृष्ण आपटे या समारंभास गेले आहेत

गुरुवार शुक्रवार दोन दिवस उमेदवारांचीं भाषणें झालीं. पहिले विषयांतील १२ उमेदवारांपैकीं भाषणास ८ च हजर होते. सहाचीं भाषणें गुरुवारीं होऊन शुक्रवारीं त्या विषयांतील २ व दुसरे विषयांतील ५ उमेदवार बोलले. शनिवारीं भाषण समारंभ तहकूब राहून रा. रा. वामन अनंत भोळे सुपरवाइझर यांचें स्वदेशीय कीर्तन झालें. आज बक्षिसांचा व सन्मानाच्या भाषणाचा समारंभ होणार आहे. उमरावतीची मंडळी मोठ्या आस्थेनें हा समारंभ करिते. व त्यास तेणेंकरून शोभाही उत्तम येते. वर्षानुवर्ष ही टूम तेथें चांगली जमत चालली आहे. पैशाचे व वक्त्याचे संबंधानें ही दिवसानु दिवस या सभेचें पुढें पाऊल आहे- १७ उमेदवार आज पर्यंत कोणत्या वर्षी आले नव्हते. व जे बोलणारे ही साल मजकुरीं मागील पेक्षां चांगले आहेत. असे दोन दिवसांची हकीकत आह्मास लिहून आली आहे तीवरून समजतें. रकमही या वर्षी चांगली जमली आहे. उमरावतीस सुमार १०० रुपये जमले, अकोल्याहून ५५ रुपये गेले. नागपुराहून रा. रा. गोपाळराव भिडे वकील यांनीं २५ रुपये पाठविले. रा. ब. नारायण भाई डायरेक्टर साहेब याचे बक्षीस या वर्षी अजून गेलें नाहीं असें दिसतें. या वर्षी मे० यासनखा साहेब अत्याची यांनीं २० रुपये या सभेला दिले असें समजतें. याप्रमाणें या सभेची भरभराट पाहून आह्मांस संतोष वाटतो. आमचे वऱ्हाडांत ही सभा झाली आहे व ती चांगली चालली आहे व अधिकाधिक भरभराटीच्या स्थितींत आहे याजबद्दल कोणा शुभेच्छूस संतोष होणार नाहीं! आमची इच्छा आहे कीं, ही व अशाच प्रकारची दुसरीं चांगलीं चांगलीं कामें साऱ्या वऱ्हाडांत मोठ मोठ्याल्या ठिकाणीं सुरू व्हावीं. व तीं अशींच भरभराटींत सदा सर्व काल असावीं.

## काबूलची लढाई

या आठवड्यांत काबुलाकडील प्रकरणांत विशेष लढाईची गोष्ट कांहीं नाहीं, तरी इंग्लिश फौजेची सरसी आहे. त्यांनीं काबुलाच्या जवळजवळ जलालाबादेस जाऊन तळ दिला आहे, तेव्हां आतां लवकरच पेट काबुलास जाईल असें दिसतें. अमीर शेरअल्ली याची तर गाळण झाली म्हणजे तो बायका पोरांसुद्धां काबुलाहून तुर्कस्थानाकडे पळून गेला. अशी सरकारी बातमी आली आहे. अहाहा! काय बादशाही शौर्य हें! इंग्लिश सरकारास एवढी घमड दाखविली, त्याप्रमाणें एकादि तरी लढाई स्वतां मारावयाची होती, आणि पळून जाण्यापेक्षां तींत मरावयाचें होतें. असो. पुढें होणाऱ्या प्रमाणें मनुष्यास बुद्धी होत असते. विश्वासघात्यानें रशियाच्या भरवशावर इंग्लशाशी दांडगेपणा केला आणि अखेर फसला असें दिसतें. त्यानें आपला मुलगा याकुबखान जो इंग्लिशाशी सख्यत्वानें वागतो म्हणून कैदेंत टेविला होता: त्याला आपण पळून जातांना खुलें केलें आहे. व तो अमीर झाला आहे. आणखी हल्लीं तोही ब्रिटिश सरकाराशी विरुद्ध वागून, लढाईच चालू ठेवणार आहे अशीं वर्तमानें आलीं आहेत. खरें काय असेल तें असो. त्यानें टिकाव धरला व विरुद्ध राहिला तर तो पुन्हांही कैद होईल. किंवा मरून जाईल. असें म्हणतात कीं, अमीर शेरअलि अजूनही इंग्लिशास शरण आला नंतर त्याला हे पुन्हा राज्यावर बसवितील. नाहींपेक्षां दुसरा कोणी राजा करून ब्रिटिश सरकार तेथील राज्याची सुरळीत व्यवस्था करील. काय होतें पहावें!

**प्रदर्शन**— मुंबईस कलाकौशल्याचें प्रदर्शन येत्या फेब्रुवारी महिन्याचे १८वे तारखेस सुरू होणार. त्यासाठीं सरकाराला २५०० रुपये उसने मागितले आहेत. वस्तु पाठविणारांनीं फेब्रुवारीच्या पहिले तारखेच्या आंत पाठवाव्या असें प्रसिद्ध झालें आहे.

## वऱ्हाड.

मि० जोन्स साहेब कमिशनर वाशिम कडून फिरतफिरत उमरावतीस जाऊन दाखल झाले.

एथील कायमचे तहशिलदार मे० आर्देसर दिनसाजी साहेब हे रजेवर आहेत व त्यांची रजा ता० ५ जानेवारीला पुरी होणार आहे व अधिक दोन महिन्यांची रजा घेण्याचा त्यांचा इरादा आहे कारण त्यांची प्रकृति पूर्वी पेक्षां जरी बरी आहे तरी तूर्त कामावर रुजू होण्यासारखी अजून शक्ति आली नाहीं असें समजतें.

साल मजकूरच्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेत अकोल्याहून रा. रा. हरी शास्त्री भाडबडेकर मास्तर यांचे चिरंजीव महादेव हरी हे गेले होते व ते पास झाले हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

उमरावतीस महामारीचा उपद्रव फार झाला आहे अशी एथें वार्ता आली होती परंतु तिकडून पत्र आल्यावरून समजतें कीं, ह्मणण्या सारखा हा उपद्रव तेथें ही मुळींच नाहीं. कांहीं दिवसांमागें तशा सारखा थोडा उपद्रव झाला होता पण आतां कांहीं नाहीं. कारंजाजवळ पोहे या गावीं १०० मनुष्य या रोगानें मेल्याचे ऐकिलें होतें पण तेंही खोटें आहे.

---

सा० मनकुरीं आमच्या अकोल्याच्या हायस्कुलाचा म्याट्रिक्युलेशन परिक्षेचा परिणाम चांगला झाला नाहीं. ९ मुलें गेलीं होतीं त्यांतून १ पास झालें. आणि उमरावतीहून ७ गेलीं होतीं त्यांत ४ पास झालीं. हें रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी तेथील हेडमास्तर यांनां मोठें भूषण होय. मागेंही घडलेल्या उमरावती हायस्कुलावर नेटिव हेडमास्तर नेमले होते तेव्हां त्यांनीं तें चांगलें सुधारलें होतें व परिणाम उत्तम करून दाखविला होता. यावरून असें दिसतें कीं जेव्हां उभय हायस्कुलावर युरोपियनच हेडमास्तर होते तेव्हां दोघेंही सारखे विद्वान ह्मणून त्यांच्यात बोभाट्यासारखा विशेष फरक दिसत नसे. आणि जेव्हां एकावर नेटिव मास्तर आणि दुसऱ्यावर युरोपियन मास्तर नेमू लागले तेव्हां असा फरक पडत चालल्याचें दिसू लागलें आहे. परंतु हें चांगलें चिन्ह नव्हे युरोप खंडांतल्या परम सुशिक्षित विद्वानें खरे प्रकाशित जे इंग्लिश लोक इकडे येतात त्यांची नेटिवावर सरशी असावयाची, परंतु याच गोष्टींत हा उलट परिणाम कां दिसू लागला हें राव बहादुर डायरेक्टर साहे[illegible] आतां बारकाव्यानें पाहिलें पाहिजे. [illegible] सुधारणा होण्याजोगें जें असेल तें [illegible] राहिजे. थोड्या पगाराचे नेटिव हेड[illegible] अधिक उपयोगी ठरत चालले त[illegible] [illegible]ंत एक तरी युरोपियन पाहि[illegible] [illegible]गीच आग्रह ते धरणार ना[illegible] [illegible]ह्मांस वाटतें. आणि युरोपिय[illegible] [illegible]या इकडे विशेष उपयोग होत नसला ह्मणजे त्यांच्या अयोग्यतेनें नव्हे नेटिव थोडक्यात तसे मिळू लागले ह्मणून सरकार त्यास काढून टाकील. किंवा टाकावे असे कोणी ह्मणणार नाहीं. दुसरी असिस्टंट कमिशनर सारखी एकादी जागा सरकारानीं त्यास द्यावी व निवळ नेटिव विद्वानांच्या श्रमानें व बुद्धीनें हीं दोन्हीं हायस्कुलें कशीं चालतात तें एकवार पहावें. कोणी ह्मणतात अकोल्यास वरचे वर्गांत आतां मुलें अगदीं कमी आहेत. ह्मणून शिकविण्याचें विशेष काम हेडमास्तरास पडणार नाहीं यासाठीं ते कदाचित रजा घेऊन विलायतेस जातील. आह्मांस ही गोष्ट ठाऊक नाहीं. पण खरोखर वरचे वर्गांत मुलें असावीं तितकीं नसलीं तर पुढच्या वर्षाच्या परिक्षेच्या परिणामाचे डोहळे आतांच दिसू लागून लोकांस वाईट वाटेल. सबब मास्तरानीं खबरदारी घेऊन [illegible] गोष्टीचा बंदोबस्त करावा व रजेवर जाऊ नये अशी आह्मी त्यासही शिफारस [illegible]तों.

---

फारेस्ट खात्यांत बदती करितां केलेले ठराव हिंदुस्थान सरकारानें मंजूर केले व ते एप्रिलचे १६वे तारखेपासून अमलांत आणावे असा ठराव झाला.

---

रंगस्वामी मुदलीयार पश्चिम वऱ्हाडांतील सेकंड क्लास ओव्हरसियर यांस पहिले तारखेपासून कमी केलें व त्यांचें नाव नोकरीचे पटांतून काढून टाकिलें.

---

हवामान— आतांशी थंडी मनस्वी पडूं लागली आहे. थंडीच्या योगानें रब्बीच्या पिकास चांगलें पोषण मिळतें. पण "अति सर्वत्र वर्जयेत्" याप्रमाणें अवस्था होईल कीं काय असे तर्क प्रखर थंडी पडू लागताच लोक काढू लागले होते. व त्याप्रमाणें या आठवड्यांत आसपासून वर्तमानें आलीं कीं कोठें कोठें मिरच्या वांगीं व कपाशी यांचे पिकावरून दव गेला ह्मणजे अति थंडीनें झाडें सोकून गेलीं, काल सकाळीं अभ्रेंही आलीं होतीं येणें करूनही लाक, हरभरा वाटाणा वगैरे पिकांचें नुकसान होईल असें ह्मणतात. तूर्त पिकें बरीं आहेत.

---

रा. रा. रामराव गोविंद एकस्टां असिस्टंट कमिशनर कोर्ट कारंजा हे शुक्रवारीं एथें येऊन काल परत गेले.

---

खामगाव स्माल काज कोर्टाचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. शंकररावजी हे एथें आले होते.

---

चोऱ्या— एथील वकील रा. रा. मयो लक्ष्मण यांचे एथें गेले आठवड्यांत चोरी होऊन दोनशें रुपयांचा ऐवज गेला असें समजतें. त्याचप्रमाणें स्टेशनाकडे एकाचे घरांतून कापडाचा गठ्ठा गेला यापैकीं कांहीं कपडे पत्यांत आले असें समजतें.

---

चांदवडचे मामलेदार रा. रा. राघव ब्रह्मगिरी हे रजा घेऊन या आठवड्यांत एथें आले होते व काल इलिचपुरास आपले बंधुकडे गेले.

---

रा. रा. सखाराम दत्तात्रय येथील तहशिलदार यांस मूर्तिजापुरास जाण्याविषयीं हुकूम झाला आहे असें समजतें व मूर्तिजापुरचे तहशिलदार मे॰ मुबारक अली साहेब यांची पुसदचे जागेवर नेमणूक केली असावी.

---

दुःखप्रदर्शन—चक्रवर्तिनी पदधारणाचा समारंभ सन १८७७ पासून सुरू झाला व तो दरसाल तेच दिवशीं ठिकठिकाणीं मोठ्या आनंदानें होत असे व यंदाही तो व्हावयाचा; परंतु चक्रवर्तिनी साहेबांचे कन्येच्या मरण दुःखप्रदर्शनार्थ बंद रहाणार असें समजतें.

---

रा. रा. पांडुरंग दाजी [illegible] दवणकर एथील मिडलक्लास स्कुलाचे हेडमास्तर यांनीं आणखी ४ महिन्यांची फर्लो रजा मागितली आहे. पहिली रजा सहा महिन्यांची झाली व ही आणखी घेत आहेत तेव्हां यांचा बेत पुन्हा इकडे परत येण्याचा नसावा असें वाटतें.

---

मुलींच्या शाळेला सरकारांतून मदत आली— एथील मुलींची शाळा अगदीं बंद पडलेली एथील सुधारणेच्छु लोकांनीं परिश्रम घेऊन पुन्हा स्थापन केली हें आमचे वाचकास आठवत असेलच. हल्लीं आह्मास कळविण्यास संतोष वाटतो कीं, या शाळेला दरमहा १२॥ रुपये प्रमाणें सरकारांतूनही मदत मिळण्याची मंजुरात मिळाली. आतां इची स्थिति दिवसेंदिवस सुधारेल अशाविषयीं एथील रहिवाशी चांगली काळजी घेतील व पैरवी ठेवतील असें आह्मी इच्छितों.

---

नादू, नजरबंद, व कसरती याचे खेळ करणारी मंडळी एथें आली आहे. व गेले गुरुवारीं त्यांचा खेळ होणार ह्मणून जिकडे तिकडे छापील जाहिराती लागल्या होत्या परंतु मंडळी न जमल्यामुळें खेळ झाला नाहीं. यांणीं टिकाटाचे दर मात्र उत्तम नाटककारांप्रमाणे १ रुपया ८ आणे ४ व आणे असे ठेविले आहेत असें समजतें.

---

या तालुक्याचे चीफ कानस्टेबल रा. रा. गोविंदराव भाऊ हे पायाला फोड वगैरे होऊन आजारी आहेत असें समजतें.

---

एथील स्कोमिंग साहेबाचे व हार्वे साहेबांचे गिरण्यांतून कापसाची पक्की गठडी दाबण्याचा प्रथम समारभ तारीख १ जानेवारी रोजीं होणार असें ऐकतों

---

मुसलमान लोकांच्या मोहरमाची आज पांचवी तारीख आहे तरी अजून त्यांची कडेकोट तयारी दिसून येत नाहीं. ढोल वाद्यांचीं मात्र गर्जना केव्हां केव्हां चालू असते.

---

डा॰ एस ए रीड एल एम डी एक्झिक्युटिव इंजिनियर पूर्व वऱ्हाडच्या आपल्या नमणुकीवर दुसरे तारखेस रुजू झाले.

---

मे. जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी काल रात्रीं बोरगावाकडे गेली.

मे. डिपुटी कमिशनर साहेबांची स्वारी या आठवड्यांत एथें येऊन पुन्हा दवऱ्यावर गेली.

राव बहादुर डायरेक्टर साहेबांची स्वारी शिरपुराकडे आहे.

प्रसिद्ध गुफतारसिंग याचा सोबती रामदीन याला पुन्हा पकडून अटकेंत ठेविलें आहे व तो जामीन देणार नाहीं तर तीन वर्षें पर्यंत यानें कैद भोगावी असा ठराव झाला आहे.

इलिचपुर जिल्ह्याचे डे॰ ए॰ इ॰ रा॰ रा॰ बळवंत नरसिंह मुधोळकर यांनीं तीन महिन्यांची रजा मागितली आहे असें कळतें. उ. भ.

---

नोटिस.

रा. रावजी वल्लद गंगाजी सदाफळ जात कुणबी वस्ती मौजे हातें तालुके बाळापुर यास हिरालाल मथुरादास साहु दुकान हातें तालुके मजकूर वहिवटदार सुखराम यानकडून नोटिस देण्यांत येतें कीं आमचे तुह्माकडे खाते बाकी रुपये ११६ पांचशें पंधरा निघाले हे रुपये ही नोटिस तुह्मास पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आणून द्यावे. या प्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चा सुद्धां रुपये भरून घेऊ, या नोटिशीचा खर्च तुह्मांवर बसेल. कळावें तारीख २० माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

( सही ) हिरालाल मथुरादास व. हिवटदार सुखराम राजाराम.

---

नोटिस.

रा. मदनजी वल्लद दर्याजी गावंडे वस्ती दापुरें प्रगणें महान तालुके अकोलें यास खालीं सही करणार यानकडून नोटिस देण्यांत येतें कीं, आमचे तुह्माकडे ८० रुपये खाते बाकी, जवारी खंडी ३॥। पावणेचार, लाक १॥।४ एक खंडी एकोणीस मण येणेंप्रमाणें घेणें आहे तर ते तुह्मी देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर हे पावल्यापासून ८ दिवसांचे आंत सदहू रुपये, जवारी व लाक आणून द्यावे नाहीं पेक्षां तुह्मावर फिर्याद करणें भाग पडेल व तेणेंकरून कोर्टखर्च तुह्मांस द्यावा लागेल. या नोटिशीचा खर्च तुह्मांपासून घेतला जाईल. कळावें. तारीख २० माहे डिसेंबर सन १८७८ इसवी.

( सही ] सवाईराम मगणीराम साहु दुकान मौजे हिसांग तालुके अकोलें वहिवाटदार जगन्नाथ.

---

## वर्तमानसार

मुंबईचे नामांकित पंडित वे. शा. सं. गट्टुलालजी याजकरितां फंड जमत आहे त्याची रकम १८३१० रुपये झाली व ती अजून वाढत आहे.

मुंबईचे कायदे कौंसलांत इरिगेशन ह्मणजे पाटबंधारे यांचे संबंधानें एक कायद्याचा मसूदा निघाला आहे त्यांत असा प्रकार आहे कीं सरकारी बंधाऱ्याजवळ जीं शेतें असतील त्यांवर सारा आठ आणे एकर प्रमाणें द्यावा मग ते शेतवाले पाटाचें पाणी उपयोगास घेवोत अगर न घेवोत. हें कलम सर्वानुमतें मंजूर होईल असें वाटत नाहीं. या मसुद्यांत २ कोटि रुपये पाटबंधाऱ्याकडे खर्चावे असेंही आहे.

मुंबईचे म्युनिसिप्यालिटीनें चक्रवर्तिनी साहेब याची कन्या अकालीक मृत्युनें मरण पावल्याचे दुःखाबद्दल सांत्वनार्थ पत्र पाठविण्याचा ठराव केला आहे.

श्री॰ पंत सचीव संस्थान भोर यांची सही स्वारी आज दोन प्रहरच्या ट्रेनींतून उत्तर हिंदुस्थानांत जाण्या करितां गेली. स्वारीं दिल्ली, मथुरा, आग्रा, कलकत्ता वगैरे मोठमोठीं प्रसिद्ध शहरें पाहून काशीस आल्यावर श्रीमंतांचें कुटुंब व इतर मनुष्यें मागाहून तेथें जाणार ह्मणून समजतें. ज्ञा. प्र.

ब्रिटिश सरकाराकडून लिहून गेल्यावरून रशियन सरकारानें काबुलांत गेलेल्या मिशनास ह्मणजे वकील मंडळास परत बोलाविलें असे समजतें.

हिंदुस्थानात १९००० नेटिव सैन्य अधिक ठेवावें असा विलायतेंत विचार चालला आहे.

केप आफ गुड होपकडे काफर लोक त्रास देत आहेत त्यांचे बंदोबस्ताचे बाबतींत सर बार्टर फ्रेयर साहेब यांनी त्याचा राजा सिटिवायो यास अल्टिमेटम ह्मणजे निकराचें पत्र पाठविलें आहे.

चक्रवर्तिनी साहेबांचे चिरंजीव ड्युक आफ कनाट यांचा इतक्यांत विवाह होणार होता परंतु तो त्यांची वहीण नुकतीच निवर्तल्यावरून तूर्त रहीत झाला आहे.

काबुलच्या लढाईचा सर्व खर्च हिंदुस्थानावर घातला जाणार नाहीं. इंग्लंड काहीं भाग आपणावर घेईल अशी अर्थाची प्रधान मंडळींनी आशा दाखविली आहे.

विलायतेंत शेतकीच्या आणि कलाकौशल्याच्या संबधानें उद्योग करणारांची स्थिति या सालीं फार वाईट झाली आहे असें कळतें.

पार्लमेंट सभा फेब्रुवारीचें १३वे तारखेपर्यंत बंद झाली आहे.

काबुलच्या अमीराकरितां रशियन सरकार काहीं मध्यस्थी करूं लागल्यास ती ऐकावयाची नाहीं असा ब्रिटिश सरकारचा निश्चय असल्याविषयीं विलायतच्या वर्तमानपत्रांतून बातमी आली आहे.

हिंदुस्थानांत या साल अखेर शिल्लक दीड कोटि रुपये रहातील व त्यांतून सवा कोटि रुपये काबुलचे लढाईस दिले जातील असें विलायतेंत इंडिया कौन्सलांत ठरत आहे.

रशियाचें मिशन काबुलांत गेलें होतें त्याचें व अमीराचें बोलणें झालें त्यांत रशियन ह्मणालें की अमीराची राजसत्ता आह्मी कबूल करूं व त्याचें स्वातंत्र्य राखू. ब्रिटिश मिशनाविषयीं अमीरानें त्यांस पुसल्यावरून ते ह्मणाले कीं आपली अर्शीच दोन देशांतून दोन जुन्मी मिशनें तुह्माकडे येतील. या बोलण्याच्या लेखावरून व इतर पत्रव्यवहाराच्या धोरणावरून अमीरानें इंग्लिश सरकारचें मिशन येऊं देण्यास हरकत केली असें ह्मणतात.

इटाली देशांत जुनें प्रधानमंडळ बदलून नवें झालें.

तुर्कस्थानांत अड्रियानोपल एथें रशियन फौज ती आपले धान्य व घोडे वगैरे विकीत आहे. पुढील महिन्यांत तें ठाणें रशियन लोक सोडून देणार असें वर्तमान आहे.

व्हाइसराय साहेब लाहोराहून २१वे तारखेस कलकत्यास आले.

म्हैसुरचे चीफ कमिशनर मि. गार्डन साहेब लवकरच कलकत्यास जाणार आहेत. म्हैसुर परत देण्याचे बाबदांत ही त्यांची स्वतांची खेप होणार आहे.

सातारचे महाराष्ट्रमित्र वर्तमानपत्र त्याचे मालक रा. रा. गणेश नारायण कोलटकर यानीं विकावयास काढिलें आहे व जाहिरात दिली आहे.

नागापाहाडाकडून खबर आली आहे कीं चेडुवा नावाचें खेडें. तेथील लोक उपद्रव देतात ह्मणून ब्रिटिश फौजेनें उद्वस्त करून टाकलें.

सर मिचल किनडी यांस व्हाइसराय साहेबांनी कायदे कौन्सलांत मेंबर नेमिलें.

काश्मीरचे महाराजांनीं अलीकडे शालीचा व्यापार कमी झाल्यापासून रेशीम काढण्याचे कारखाने पुष्कळ वाढविले व तेथील रेशीम विलायतेंतही उत्तम ठरलें. पण दुःखाची गोष्ट कीं या सालीं रेशमाच्या किड्यांत काहीं रोग होऊन पुष्कळ किडे मरण पावले. यामुळें या व्यापारास ही बराच धक्का बसून धंदेवाले लोक उपाशी मरूं लागले आहेत.

सन १८७७ सालांत सर्प दंशापासून व घातकी जनावरांपासून १९९९९ मनुष्यें मेलीं व ६३१९७ गुरांचा नाश झाला ज्या घातकी प्राण्यांचा नाश झाला तो येणें प्रमाणें:— सर्प १२७२९९ घातकी जनावरें २२८५१. घातकी जनावरांचा व सर्पांचा नाश करण्याबद्दल १०३१२७ रु. ६ पयें ९ आणे ६ पै बक्षीस देण्यांत आलें.

पारीस प्रदर्शनांत अमेरिकेंतील लोकांनीं ७९० बक्षीसें मिळविलीं.

गेल्या मद्रासच्या दुष्काळांत बंगाल्यांतून मद्रासेस ४ कोटि मण तांदूळ गेले असें टकमनकंपनीच रिपोर्टांत लिहिलें आहे.

राजकोटकडे टोळांनीं पिकांचा फार नाश केला असें समजतें. ने. ओ.

आगबोटीची टक्कर— जनरल मेल स्टीमर पामेरनिआ अमेरिकेवडून परत येत असतां डोव्हर जवळ मोअर इन्डियन आगबोटीशी टक्कर होऊन बुडाली तिजवरील ९० मनुष्यें मेलीं.

माळेगांवचे राजे अमिरसिंग रतनसिंग जाधव हे मागील सोमवारीं पुणें एथें मरण पावले. यांचें वय सारे तीस वर्षांचें होतें. यांची मातुश्री व तीन बायका पाठीं आहेत. त्यांच्या पोटीं संतान काहीं नाहीं. व कोणी दत्तकही घेतला नाहीं यांची जहागिर सुमारें तीस हजारांची आहे.

कलकत्त्या जवळ नदिया प्रांतांत रोड सेस ( रस्त्यावरील जकाती ) च्या फंडाच्या व्यवस्थेंत इतका अंधार आहे कीं, या फंडाचे माजी अध्यक्ष मि० स्टीवन्स आणि माजिस्ट्रेट यांच्याकडे १८७६ सालापर्यंत चार वर्षांत ८४,८९० रु० किंमतीचे बनावटीचे चेक पटवून रु० नेले.

अमेरिकेंत एक अचाट शोध —— चिकागो येथील मि० स्टेपल नावाच्या गृहस्थानें काढला आहे. हा शोधाचें स्वरूप असें आहे कीं, समुद्राची भरती व ओहटी यापासून अखंड व हवा तितका वेग मिळण्यासारखा आहे व या वेगाच्या घर्षणापासून प्रकाश. उष्णता व यंत्रे चालविण्यास वेग हवा तितका मिळेल. हें सिद्धीस नेण्यास सुमार ९ अब्ज रुपये पाहिजेत. ह्मणजे समुद्राच्या काठीं दोन अफाट भिंती बांधून भरतीचें पाणी आंत कोंडून पानचक्क्यासारखी पाण्याच्या जोरानें चक्रें चालवून त्यापासून विद्युलता व तिजपासून सर्व युनेटेड स्टेट्स ह्मणजे ३६ राष्ट्रांस प्रकाश, उष्णता आणि यंत्रास वेग पुरवितां येईल अशी योजना केली आहे व वरील रकमेची मागणी एथील कांग्रेसकडे मि० स्टेपल करणार आहेत. सु.प.

## युनिव्हर्सिटीच्या पदव्या घेणाऱ्या लोकांविषयीं सरकारचा नवीन ठराव.

गेल्या ह्मणजे ता० १९ मिनहूच्या सरकारी ग्याझेटांत सदहू ठराव छापून प्रसिद्ध झाला आहे, व तो येत्या जानेवारी महिन्याच्या १ ल्या तारखेपासून अमलांत यावयाचा आहे. हा ठराव करण्याचे सरकारचे उद्देश उंच प्रतीच्या शिक्षणास उत्तेजन मिळावें, जे लोक युनिव्हर्सिटीच्या पदव्या घेतील त्यांचें सरकारच्या सामर्थ्यानुरूप हित व्हावें, व अमल बजावणीचें काम सुशिक्षित लोकांकडून व्हावें हे असून, आजपर्यंत रेव्हिन्यु खात्यांतील मोठमोठ्या जागा युनिव्हर्सिटीच्या लोकांस मिळत नव्हत्या त्या मिळाव्या एतदर्थ सरकारांतून नियम करण्यांत आले आहेत, त्यांचा सारांश येणें प्रमाणें:— मुंबई युनिव्हर्सिटीच्या ग्रज्युएट लोकांपेक्षां ज्या कोणाची रेव्हिन्यु खात्यांतील मोठमोठ्या जागा मिळविण्याची इच्छा असेल, त्यानीं निदान एक वर्ष पर्यंत मामलेदारांच्या हाताखालीं दुय्यम कारकुनाचें काम प्रोबेशनर दाखल केलें पाहिजे, व इतउत्तर ह्या जागा द्यावयाच्या त्या सालीं ठरविलेले अपवाद खेरीज करून फक्त ग्रज्युएट लोकांस च देण्यांत येतील. दुय्यम कारकुनाचें काम एक वर्षपर्यंत करून त्यांस हिशेबी कामाची पूर्ण वाकबगारी आली हा जे त्यांची मुंबई मुकामीं परीक्षा होईल व तिचा उद्देश गांवचे, जिल्ह्याचे व हजूरचे हिशेब. मुलकी कामासंबंधें अवश्य लागणारे कायदे, मोरपट्टीच्या आकारणी संबंधीं नियम, सारांश मामलेदार लोकांस जितक्या गोष्टी ठाऊक असणें अगत्य आहे. तितक्या गोष्टींची या लोकांस माहिती आहे कीं नाहीं हें पहाण्याचा आहे. ही त्यांची परिक्षा उतरली ह्मणजे ते मामलेदारांच्या हाताखालीं सबमाजिस्त्रेटाचें व अव्वल कारकुनाचें काम करण्यास लायक झाले असें समजावें, व या मुदतीपर्यंत त्यांची वर्तणूक चांगल्या प्रकारची आहे, व त्यांनीं आपलें काम ही चांगल्या रीतीनें केलें आहे असें दिसून येईल, तर अव्वल कारकुनाची जागा झाली कीं, ती अगोदर त्यांस देण्यांत येईल. ही परिक्षा उतरून जे लोक अव्वल कारकुनाच्या जागेस योग्य ठरतील, त्या लोकांची एक यादी प्रत्येक जिल्ह्याची कलेक्टर आपणाजवळ बाळगील, व अव्वल कारकुनाची जागा देणें ती या यादींतील अनुक्रमाप्रमाणें देण्यांत येईल. सहा महिने पर्यंत ह्या प्रमाणें सबमाजिस्त्रेटाचें व अव्वल कारकुनाचें काम केल्यानंतर त्यांस " हायर स्टांडर्ड " च्या परिक्षेस येण्याची परवानगी मिळेल व ती परिक्षा त्यांनीं उतरल्यावर जर त्यांची वर्तणूक चांगल्या प्रकारची असून कामकाजांत ते तरबेज आहेत असें दिसून येईल तर ते मामलेदाराचें काम करण्यास लायक समजले जातील व मामलतीच्या जागा रिकाम्या होतांच त्यांस मामलेदार करण्यांत येईल; परंतु ह्या जागा त्यांस देतेवेळीं ज्या "हायर स्टांडर्ड" च परीक्षेत त्यांच्या गुणाप्रमाणें अनुक्रम लागला असेल त्या अनुक्रमानें देण्यांत येतील, व याबद्दलची यादी प्रत्येक जिल्ह्याच्या कलेक्टरपाशीं असेल. मामलेदाराच्या जागेचे जे वर्ग व्हावयाचे ते सिनिआरिटी प्रमाणें होत जाऊन क्रमाक्रमानें जागा रिकाम्या होतील त्याप्रमाणें आधीं शेवटच्या ग्रेडच्या डेप्युटी कलेक्टरची जागा देण्यात येईल.

आतां हे नियम प्रसिद्ध होण्याचे पूर्वीच ज्यांस मुलकी खात्यांत नोकरी मिळाली असेल त्यांचें, हे नियम झाल्याच्या योगानें नुकसान होऊं लागेल ते होऊं नये. एतदर्थ सरकारांनीं असाही ठराव केला आहे कीं, येत्या जानेवारी महिन्याच्या १ ल्या तारखेच्या पूर्वी जे लोक रेव्हिन्यु खात्यांत नोकरीस लागले असतील त्यानीं हे नियम अमलांत आल्यापासून दोन वर्षांचे आंत वर लिहिलेल्या परिक्षा इंग्रजी भाषेंत दिल्या तर त्यांचें व ग्रज्युएट लोकांचे दुय्यम कारकून, अव्वल कारकून, मामलेदार व डेपुटी कलेक्टर या जागा मिळण्याच्या संबधानें हक्क सारखे समजले जातील; परंतु या परिक्षांस येण्याची परवानगी त्यांस कलेक्टर लोकांकडून मिळाली पाहिजे, व तीही त्यानीं त्यांची लायकी पाहिल्यावाचून त्यांस देऊं नये. येणेंप्रमाणें सरकारच्या ठरावाचा सारांश आहे हल्लीं युनिव्हर्सिटीच्या मोठमोठ्या परीक्षा दिलेले लोक चोहोंकडे पुष्कळ रिकामे पडले असून त्यांस नोकऱ्या मिळत नाहींत व यामुळें उंच प्रतीच्या शिक्षणाविषयीं लोकांचे उत्तरोत्तर दुर्लक्ष होऊं लागलें आहे, अशा प्रसंगीं सरकारचा या विद्येस उत्तेजन देण्याचा हेतु अत्यंत स्तुत्य आहे असें आमच्यानें ह्मटल्यावाचून रहावत नाहीं तथापि ह्या हेतूमुळें वस्तुतः उत्तेजन कितीं मिळेल याचा विचार करितां तूर्त तरी तें फार मिळेलसें आह्मांस वाटत नाहीं. कारण वरील नियमांच्या शेवटीं सरकारानीं असा एक नियम केला आहे कीं दुय्यम कारकूनाचे जागीं असणाऱ्या ग्राज्युएटास साधारण बऱ्याच दिवसांनीं जितकी माहिती होणें अवश्य आहे तितकी झाली नाहीं किंवा अठरा महिन्यांत लोअर स्टांडर्डची डिपार्टमेंटल परिक्षा उतरली नाहीं तर त्यास नोकरीवरून दूर करण्यांत येईल व असें झालें असतां पुढील आयुष्य जें दीड वर्ष खर्च केलें त्याचा काहीं उपयोग नाहींसा होणार आहे अस्तु. तूर्त आह्मांस याविषयीं विशेष मजकूर लिहावयाचा नाहीं, तथापि वरील नियम वाचून परंतु इंग्रजी भाषेचा गंधही नाहीं अशा ज्या हजारो लोकांनीं आपलीं बहुतक आयुष्यें मुलकी खात्यांतच घालविलीं त्यांची मात्र या योगें निराशा होणार आहे याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें

इं. प्र.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत लक्ष्मण बाळाजी करंदे यानीं छापून प्रसिद्ध केलें.